

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर




## ई मासिक विद्यासंवाद

# शताब्दी महोत्सव विशेषांक



ई मासिक विद्यासंवाद

शताब्दी महोत्सव विशेषांक

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ १०० शताब्दी वर्ष १९२३ - २०२३

ऑगस्ट २०२३ | आवृत्ती-०२


मार्गदर्शक
**डॉ. सुभाष चौधरी**
कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**डॉ. संजय दुधे**
प्र-कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

प्रकाशक
**डॉ. राजू हिवसे**
कुलसचिव
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

संपादक
**श्री. प्रेमदास वाडकर**
जनसंपर्क अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

मुद्रक
**श्री. प्रवीण गोतमारे**
प्रकाशन अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर




मा. राज्यपाल
**श्री. रमेश बैस**



मा. कुलगुरु
**डॉ. सुभाष चौधरी**



मा. प्र-कुलगुरु
**डॉ. संजय दुधे**



मा. कुलसचिव
**डॉ. राजू हिवसे**

## रेशिमबाग स्थित सुरेश भट सभागृह येथे पार पडलेल्या विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सव समारंभाची क्षणचित्रे





















विशेष अतिथी
श्री. एकनाथ शिंदे
मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
श्री. देवेंद्र फडणवीस
मा. उपराष्ट्रपती, भारत
समारंभाचे अध्यक्ष
श्री. रमेश बैस
मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य व
राज्यातील सर्व विद्यापीठांचे कुलपती
विशेष अतिथी
श्री. नितीन गडकरी
श्री. चंद्रकांत (दादा) पाटील
डॉ. संजय दुधे
शताब्दी महोत्सव समारंभ
४ ऑगस्ट २०२३
Centenary Celebration Programme
4th August 2023
1923-2023
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ
शताब्दी
महोत्सव
समारंभ


प्रमुख अतिथी
श्री. जगदीप धनखड़
मा. उपराष्ट्रपती, भारत
समारंभाचे अध्यक्ष
श्री. रमेश बैस
मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य व
राज्यातील सर्व विद्यापीठांचे कुलपती
विशेष अतिथी
श्री. एकनाथ शिंदे
मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
श्री. देवेंद्र फडणवीस
मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
श्री. अजित पवार
मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
डॉ. सुभाष चौधरी
Centenary Celebration Programme
4th August 2023
1923-2023
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ
शताब्दी
महोत्सव
समारंभ
४ ऑगस्ट २०२३


मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
डॉ. सुभाष चौधरी
मा. कुलगुरू,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
डॉ. राजू हिवसे
संसदीय कार्य विभाग, महाराष्ट्र राज्य
डॉ. संजय दुधे
मा. प्र-कुलगुरू,


डॉ. संजय दुधे
मा. प्र-कुलगुरू,


डॉ. सुभाष चौधरी
मा. कुलगुरू,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ



## भारतीय ज्ञान अप्रतिम - मा. उपराष्ट्रपती




### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा शताब्दी महोत्सव समारंभ
### उपराष्ट्रपती श्री. जगदीप धनखड यांच्या हस्ते शतदीपपूर्तीचे विमोचन

भारतीय ज्ञान परंपरा अप्रतिम असल्याचे प्रतिपादन भारताचे माननीय उपराष्ट्रपती श्री. जगदीप धनखड यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा शताब्दी महोत्सव समारंभ येथील रेशीम बाग चौक स्थित कविवर्य सुरेश भट सभागृहात शुक्रवार, दिनांक ४ ऑगस्ट २०२३ रोजी दुपारी ३.३० वाजता पार पडला. या समारंभात प्रमुख अतिथी म्हणून उपराष्ट्रपती मार्गदर्शन करीत होते. महाराष्ट्र राज्याचे मा. राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती श्री. रमेश बैस हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी व्यासपीठावर केंद्रीय परिवहन व महामार्ग विभाग मंत्री श्री. नितीन गडकरी, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांची उपस्थिती होती.

भारतीय ज्ञान अवगत करण्यासाठी विदेशातून विद्यार्थी येत हा भारताचा इतिहास असल्याचे सांगत मा. उपराष्ट्रपती श्री. धनखड यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे गेमचेंजर ठरणार असल्याचे सांगितले. एनईपी २०२० मध्ये अधिक लवचिकता असून सर्व राज्यांनी याचा अवलंब करणे गरजेचे आहे. मात्र, काही राज्य एनईपीचा अवलंब न करीत विद्यार्थ्यांवर अन्याय करीत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या या मंचावरून त्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविण्याचे आवाहन करीत आहे, असे उपराष्ट्रपती म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशात आज अनेक स्टार्टअप होत आहे. त्याकरिता पैश्या बरोबरच ज्ञान महत्त्वाचे आहे. देशात आज अनेक बदल होत आहे. जगात डिजिटल ट्रांजेक्शन करण्यात भारत अग्रेसर आहे. देशामध्ये सर्वाधिक इंटरनेटचा वापर करणारे आहे. अमेरिका आणि चीन पेक्षा भारतीय सर्वाधिक डाटा वापरत असून हे मोठी आर्थिक महासत्ता असण्याचे लक्षण आहे. भारत जगातील मोठी आर्थिक महासत्ता बनण्याकडे वाटचाल करीत आहे. स्वातंत्र्याचा शताब्दी महोत्सव साजरा करू त्यावेळेस भारत विश्वगुरु बनलेला असेल, असे माननीय उपराष्ट्रपती म्हणाले.

भारताला विश्वगुरू बनविण्याकरिता जागतिक स्तरावर कोणता सहभाग असावा याबाबत चर्चा करण्याकरिता विद्यापीठापेक्षा वेगळे स्थान असू शकत नाही. विद्यापीठ तसेच शैक्षणिक संस्था याच्या डोमेन बनाव्यात असे ते म्हणाले. नवीन संकल्पना अस्तित्वात आणणारे वेगळे असे शैक्षणिक क्षेत्र आहे. सरकार या संस्थांना पाठबळ देते. देशाच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या उद्योगांमध्ये कुशल मनुष्यबळ शैक्षणिक क्षेत्रामधूनच प्राप्त होते. देशाच्या औद्योगिक विकासाकरिता उद्योग क्षेत्रातील नेतृत्वाने देखील शैक्षणिक संस्थांच्या मागे पाठबळ उभे करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. याकरिता शैक्षणिक संस्थांना देखील स्वकौशल्य दाखवावे लागेल. जगात निर्माण होणाऱ्या गरजा लक्षात घेता अशा प्रकारचे अभ्यासक्रम विद्यापीठांनी तयार केले पाहिजे. छोट्या छोट्या गोष्टी आपण आयात करायच्या का? असा प्रश्न करीत त्याची देशातच निर्मिती झाली पाहिजे. नैसर्गिक संसाधनांचा वापर करून स्थानिक स्तरावर रोजगार निर्मिती करण्याचे आवाहन त्यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला १०० वर्षे पूर्ण झाले हा आनंदाचा क्षण आहे. या विद्यापीठाचे माजी कुलगुरू, विविध क्षेत्रात नावलौकिक प्राप्त केलेले माजी विद्यार्थी हे 'थिंक टँक' आहेत. येथील सामाजिक आर्थिक विकासाच्या दृष्टीने संशोधन होण्याच्या दृष्टीने या विचार गटाचा पुरेपूर वापर करावा, असे उपराष्ट्रपती म्हणाले. समारंभाचे प्रास्ताविक करताना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ १०० वर्ष पूर्ण करीत असल्याचे सांगितले. मध्य भारतातील प्रतिष्ठित असे मोठे विद्यापीठ असून विद्यापीठामार्फत विविध उपक्रम राबविण्याची माहिती त्यांनी दिली. उपराष्ट्रपतींच्या हस्ते शताब्दी महोत्सव समारंभानिमित्त तयार करण्यात आलेल्या 'शतदीपपूर्ती' या स्मरणिकेचे प्रकाशन झाले. प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी आभार मानले. उपराष्ट्रपतींच्या हस्ते सुरेश भट सभागृहाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

पोलीस दलाने उपराष्ट्रपतींना मानवंदना दिली. कार्यक्रमाचे संचालन डॉ. अमृता इंदूरकर व डॉ. वर्षा देशपांडे यांनी केले. कार्यक्रमाला माजी खासदार, माजी आमदार, माजी कुलगुरू, विविध प्राधिकारणी सदस्य, प्राचार्य शिक्षक, अधिकारी, कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गौरवशाली पंरपरा जपा - राज्यपाल श्री. रमेश बैस

गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या विविध ज्ञानशाखांच्या माध्यमातून ओळख निर्माण करणाऱ्या नागपूर विद्यापीठाने भविष्यातही ही उज्ज्वल परंपरा कायम राखावी, असे आवाहन करुन राज्यपाल बैस म्हणाले, पूर्वी रोजगाराच्या संधी मर्यादित होत्या. आता समाजात घडत असलेल्या परिवर्तनामुळे सरकारी क्षेत्रातील रोजगार कमी होऊन खाजगी क्षेत्रातील संधी वाढत आहेत. मात्र, त्यासोबतच पदोपदी स्वत:ला सिध्द करण्याचे आव्हान ही निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमिवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दुरदर्शी नेतृत्वामुळे तयार झालेल्या नव्या शैक्षणिक धोरणामुळे उद्यमशील समाजासाठी आवश्यक असणारे कुशल मनुष्यबळ निर्माण होणार आहे. जगातील सर्वाधिक तरुण देश असणाऱ्या भारताकडे जगाचे कार्यस्थळ होण्याची क्षमता आहे. या संधीचा लाभ घेण्यासाठी युवकांनी निर्धाराने प्रयत्न करावेत. पूर्वी जगभरातून विद्यार्थी अध्ययन करण्यासाठी भारताकडे धाव घेत असत. देशातील विद्यापीठांनी हा वारसा पुढे नेतांना अधिकाधिक शिक्षक तयार करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहनही राज्यपालांनी केले.

## विदर्भाच्या विकासात महत्वाचे योगदान- श्री. नितीन गडकरी

विदर्भाच्या सामाजिक व आर्थिक विकासामध्ये नागपूरसह या भागातील पाचही विद्यापीठांचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे केंद्रीय परिवहन व महामार्ग मंत्री श्री नितीन गडकरी म्हणाले. तंत्रज्ञान व संशोधन या क्षेत्रात नागपूर विद्यापीठाने केलेल्या उल्लेखनीय कार्यामुळे औषधनिर्माण शास्त्रासह माहिती व तंत्रज्ञान क्षेत्राला देश-विदेशात या विद्यापीठाला विशेष ओळख मिळाली आहे. विदर्भाचा सर्वांगिण विकास आणि जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी या विद्यापीठाने सदैव पुढाकार घेतल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. नागपूरातील मिहानसारखा प्रकल्प येथील युवकांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारा ठरत असल्याचे सांगताना श्री. गडकरी म्हणाले की, या प्रकल्पामध्ये नागपूर विद्यापीठाच्या सुमारे एक लाख विद्यार्थ्यांना रोजगार निर्माण होईल, अशी क्षमता आहे. माहिती तंत्रज्ञान तसेच हवाई दळणवळण क्षेत्रातील अनेक प्रकल्प येथे येत आहेत. या उद्योगांना आवश्यक असलेले तज्ज्ञ व कौशल्यपूर्ण मनुष्यबळ निर्माण होईल या दृष्टीने विद्यापीठाने अभ्यासक्रम तयार करावेत अशी सूचना यावेळी केली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज याच्या विचारांचा वारसा हे विद्यापीठ पुढे घेवून जाईल असा विश्वास व्यक्त करतानाच श्री. गडकरी म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विद्यापीठाने सुद्धा विविध क्षेत्रात अमुलाग्र परिवर्तन करून विदर्भाच्या विकासामध्ये सक्रिय भूमिका बजावावी.

## विद्यापीठ सामाजिक चळवळीचे केंद्र - उपमुख्यमंत्री

नागपूर विद्यापीठाचा इतिहास गौरवास्पद असून हे विद्यापीठ केवळ शिक्षणाचे नव्हे तर सामाजिक चळवळीचे केंद्र असल्याचा गौरोद्गार महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. देश आणि समाजाची गरज भागवण्यासाठी या विद्यापीठाने आजपर्यंत समर्थपणे योगदान दिले आहे. देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामात योगदान देणाऱ्या राष्ट्रभक्त विद्यार्थ्यांना या विद्यापीठाने मदत केली होती. इंग्रज राजवटीत विद्यापीठाने महात्मा गांधींना मानद डॉक्टरेट प्रदान केली होती. तसेच त्यानंतरच्या काळात स्वातंत्र्यवीर सावरकरांनाही डिलीट प्रदान केली होती. राष्ट्रभक्तीचा मोठा संस्कार या विद्यापीठाला लाभला आहे . साहित्य, संस्कृती ,समाजकारण, राजकारण, प्रशासन, समाजसेवा आदी क्षेत्रात लक्षणीय योगदान देणाऱ्या मान्यवरांची मोठी फळी या विद्यापीठाने दिली आहे. भविष्यात पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था करण्याचे आव्हान आपल्यासमोर असताना विद्यापीठाकडून आवश्यक ते मनुष्यबळ निर्माण करण्याची जबाबदारी आहे. महाविद्यालयांना जास्तीतजास्त स्वायत्तता कशी देता येईल, कामकाजात पारदर्शकता कशी आणता येईल, रोजगाराभिमुख अभ्यासक्रम कसे सुरु करता येतील याबाबत आवश्यक ती पावले उचलण्याचे आवाहन करून शताब्दी वर्षानिमित्त विद्यापीठाला राज्य सरकारकडून १०० कोटी रुपयांचा विशेष निधी देण्यात आल्याची माहिती यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी दिली.

## शिक्षकांनी समजून घ्यावी भारतीय ज्ञान परंपरा




### माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांचे प्रतिपादन

### भारतीय ज्ञान परंपरेवर विद्यापीठात प्रशिक्षण

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात असलेली भारतीय ज्ञान परंपरा शिक्षकांनी योग्य प्रकारे समजून घ्यावी, असे आवाहन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी केले. भारतीय ज्ञान परंपरा विभाग नवी दिल्ली तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील युजीसी मानव संसाधन विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने ३१ जुलै ते ५ ऑगस्ट २०२३ दरम्यान अल्पकालीन प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सिव्हिल लाईन येथील चिटनविस सेंटर येथे पार पडलेल्या प्रशिक्षणाचा समारोप शनिवार दिनांक 5 ऑगस्ट 2023 रोजी करण्यात आला. या कार्यक्रमात अध्यक्षीय स्थानावरून कुलगुरू डॉ. चौधरी बोलत होते.

अभ्यासक्रमातील ज्ञान विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे समजावे म्हणून शिक्षकांना ही प्रणाली समजून घ्यावी लागेल असे सांगत डॉ. चौधरी यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण भारतीय ज्ञान परंपरेवर आधारित असल्याची माहिती दिली. शिक्षण कळावे म्हणून विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षकांना सोप्या भाषेत ज्ञान पोहचवावे लागणार आहे. शिवाय मातृभाषेतून दिले जाणारे शिक्षण विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे समजून येते. त्यामुळे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मातृभाषेतून शिक्षण देण्यावर अधिक भर देण्यात आला आहे. विद्यार्थ्याला समजेल तेव्हाच ज्ञानाची प्राप्ती होईल. ज्ञान उपयोगी पडत नसेल तर त्याचा काय फायदा असे कुलगुरू म्हणाले. चीनमध्ये स्वभाषेत शिक्षण घेत विद्यार्थी ज्ञान मिळवित आहे. आत्मसात केलेल्या ज्ञानाच्या बळावर चीन महासत्ता बनल्याचे कुलगुरू म्हणाले. समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी होते. प्रमुख अतिथी म्हणून श्रीनाथ पिठाधीश्वर श्री देवनाथ मठ सुरजी अंजनी ग्राम येथील प. पू. आचार्य स्वामी श्री जितेंद्रनाथ महाराज, यूजीसी सचिव प्रा. मनीष जोशी, श्री. अनुराग देशपांडे, डॉ. चंद्रशेखर देठे, डॉ. प्रीती धार्मिक यांची उपस्थिती होती.

## ज्ञान देणारी आपली परंपरा

**- आचार्य स्वामी श्री जितेंद्रनाथ महाराज**

आपली भारतीय परंपरा ज्ञान देणारी असल्याचे प्रतिपादन श्रीनाथ पिठाधीश्वर श्री देवनाथ मठ सुरजी अंजनी ग्राम येथील प.पू. आचार्य स्वामी श्री जितेंद्रनाथ महाराज यांनी केले. भारतीय ज्ञान प्रणाली समजून घेण्यासाठी आपण येथे एकत्र आलो आहोत. एखाद्या संस्कृतीची, देशाची बाब येते. तेव्हा ती किती प्राचीन आहे, याचा शोध घेतला जातो. जगातील कोणताही धर्म साडेचार हजार वर्षे जुना नाही. मात्र, आपले महाभारत ५ हजार २०० वर्षांपूर्वी घडलेले आहेत. त्यापूर्वी सूर्यवंशी हे साडेनऊ लाख वर्ष प्राचीन असे आहे. त्यामुळे आपण किती प्राचीन आहोत हे कोणाला प्रमाणित करण्याची गरज नसल्याचे श्री. जितेंद्रनाथ महाराज म्हणाले. पृथ्वी गोल आहे हे वेदांमध्ये सर्वप्रथम आपणच सांगितले. आकाशातील ग्रहांचे अंतर किती हे देखील आपल्याच पूर्वजांनी मोजले आहे. शिवाय भारतामध्ये ऋषी आणि कृषीची सभ्यता असल्याचे ते म्हणाले.

## देशभरातील प्रतिनिधींची उपस्थिती

विद्यापीठ अनुदान आयोगाचा भारतीय ज्ञान परंपरेवरील अल्पकालीन प्रशिक्षण कार्यक्रम राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात ३१ जुलै 2023 ते पाच ऑगस्ट 2023 दरम्यान पार पडला. शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने सर्वप्रथम प्रशिक्षण वर्ग राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने यूजीसीकडून देण्यात आला. देशभरातून १५७ प्रशिक्षणार्थींनी उपस्थिती दर्शविली होती. प्रशिक्षण वर्गाला भारतीय ज्ञान परंपरेचे समन्वयक श्री अनुराग देशपांडे, यूजीसीचे सचिव प्रा. मनीष जोशी, डॉ. विनायक रजत भट, आचार्य श्रेयस कुरेकर, प्रा. रितेंद्र शर्मा, वेंकट राघवन आर., प्रो. जयरमण, डॉ. पंकज सक्सेना, डॉ. पी. राममनोहर, डॉ. व्यंकटेश्वर पै, डॉ. अंकुर कक्कर, डॉ. राघव कृष्णा, डॉ. माला कापडिया, डॉ. सचिन वशिष्ठ, श्री. अमन गोपाल सुरेका यांनी विविध क्षेत्रांमध्ये देशभरातून आलेल्या प्रतिनिधींना संबोधित केले.




## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात पंचप्राण प्रतिज्ञा

### पंचमहाभूत सुरक्षित तर आपण सुरक्षित - प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे
### वृक्षदिंडीत शहरातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग










आपली पृथ्वी ही पंचमहाभूतांपासून निर्माण झाली आहे. आपण देखील त्याचा घटक आहोत. त्यामुळे पंचमहाभूत सुरक्षित असेल तर आपण सुरक्षित राहू, असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय प्र- कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने 'माझी माती माझा देश' अभियान राबविण्यात आले. या अभियान अंतर्गत महाराज बाग स्थित विद्यापीठाचा छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर ते फ्रीडम पार्क पर्यंत वृक्षदिंडी काढण्यात आली. पंचप्राण प्रतिज्ञा रासेयो स्वयंसेवकांनी घेतली. त्यानंतर दीक्षांत सभागृहात आयोजित वीरांना वंदन कार्यक्रमात प्र-कलगुरु डॉ. दुधे हे अध्यक्षीय स्थानावरून शनिवार, दिनांक १९ ऑगस्ट २०२३ रोजी मार्गदर्शन करीत होते.

आपण राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक असून कर्तव्य कठोरता हा आपला अंगीभूत गुण असल्याचे सांगत मागील वर्षी 'हर घर तिरंगा' तर यावर्षी 'माझी माती माझा देश' उपक्रम राबवित असल्याचे प्र-कलगुरु डॉ. दुधे पुढे बोलताना म्हणाले. 'माझी माती माझा देश' हे अभियान पृथ्वी वाचविण्यासाठी आहे. जल, जमीन, जंगल आपणास वाचवायचे आहे. झाड हे निसर्गातील महत्त्वपूर्ण घटक असून ते आपणास प्राणवायू देतात. संपूर्ण सृष्टीची प्रकृती चांगले ठेवण्याचे काम झाड करते. त्यामुळे रासेयो स्वयंसेवक म्हणून आपण राहतो. त्या भागात वृक्षारोपण करीत वृक्षांचे संगोपन करण्याची जबाबदारी घेतली पाहिजे असे डॉ. दुधे म्हणाले. लोकांनी आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी वृक्षतोड केली. सोबत भौतिक गरजा पूर्ण करण्यासाठी आधुनिकीकरणाच्या नावाखाली प्रदूषणास सुरुवात झाली. त्यामुळे शहरात सिमेंट व प्लास्टिकचा कचरा निर्माण झाला. पूर्वी गावाला लागून मोठ्या प्रमाणात जंगल असायचे ती जंगले नामशेष झाली आहेत, याबाबत प्र-कुलगुरुंनी चिंता व्यक्त केली. वृक्ष लागवड करीत पर्यावरण चांगले करण्याचा प्रयत्न करा, असे आवाहन त्यांनी स्वयंसेवकांना केले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र- कुलगुरु डॉ. संजय दुधे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे, सत्कारमूर्ती माजी सैनिक संतोष मालेवार हे मंचकावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो संचालक डॉ. सोपानदेव पिसे यांनी केले. प्रास्ताविकेतून त्यांनी कार्यक्रमामागील पार्श्वभूमी विशद केली. देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव तसेच विद्यापीठाचा शताब्दी महोत्सव साजरा होत असल्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सीमेवर लढताना देशा प्रती सैन्याची निष्ठा असते म्हणून वीरांना नमन करण्याचा निर्णय सरकारने घेतला. निसर्गाचे रक्षण व्हावे म्हणून वृक्षदिंडी काढण्यात आली. सोबतच मातृभूमीला विसरू नये म्हणून पाच घटकांचा समावेश असलेली प्रतिज्ञा आपण सर्वांनी घेतल्याचे डॉ. पिसे यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीक्षांत सभागृह समोरील परिसरात प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी अधिसभा सदस्य दिनेश शेराम यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन करीत प्रकाश शुक्ला यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाला नागपूर शहरातील रासेयो विभागीय समन्वयक, जिल्हा समन्वयक, कार्यक्रम अधिकारी तसेच स्वयंसेवकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## स्वयंसेवकांनी घेतली पंचप्राण प्रतिज्ञा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने 'माझी माती माझा देश' अभियान अंतर्गत पंचप्राण प्रतिज्ञा घेत वीरांना वंदन कार्यक्रम राबविला. शनिवारी सकाळी नागपूर शहरातील विविध महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सहभागी होत वृक्षदिंडी काढली. विद्यापीठाचा छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर ते फ्रीडम पार्क अशी वृक्षदिंडी काढण्यात आली. वृक्षदिंडीनंतर रासेयो कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवकांनी पंचप्राण प्रतिज्ञा घेतली. संचालक डॉ. सोपानदेव पिसे यांनी उपस्थितांना पंचप्राण प्रतिज्ञा दिली. यावेळी नागपूर शहरातील विविध महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे शेकडो स्वयंसेवक उपस्थित होते.

## 'वीरांना वंदन' कार्यक्रमात माजी सैनिकाचा सत्कार

`विद्यापीठ दीक्षांत सभागृहात आयोजित 'वीरांना वंदन' कार्यक्रमात माजी सैनिक संतोष मालेवार यांचा विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांच्या हस्ते शाल श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना माजी सैनिक संतोष मालेवार यांनी 'माझी माती माझा देश' अभियान अंतर्गत आयोजित कार्यक्रमात सत्कार केल्याने विद्यापीठाचे आभार मानले. देशाच्या रक्षणासाठी सैन्यात सामील व्हा. गौरव वाटेल अशी अनुभूती तुम्हाला प्राप्त होईल, असे मालेवार म्हणाले. मुलींनी देखील भारतीय सैन्यामध्ये दाखल होण्याचे आवाहन त्यांनी केले. सेनेतून निवृत्त झालो तरी सत्कार होतात आणि शहीद झालो तरी सन्मान मिळतो, असे ते म्हणाले.

# उच्च शिक्षणात विद्यार्थ्यांवर अधिक जबाबदारी

**वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर यांचे प्रतिपादन**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात इंडक्शन प्रोग्राम**






उच्च शिक्षणामध्ये शिकण्यासाठी विद्यार्थ्यांवर अधिक जबाबदारी असल्याचे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर यांनी केले. विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात बीए एलएलबी फर्स्ट सेमिस्टरच्या विद्यार्थ्यांकरिता इंडक्शन प्रोग्राम पार पडला. मंगळवार १ ऑगस्ट ते शनिवार, ५ ऑगस्ट दरम्यान आयोजित कार्यक्रमाचे उद्‌घाटन करताना डॉ. कवीश्वर बोलत होते.

स्वामी विवेकानंद यांच्या वचनाचा आधार घेत उच्च शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांनी स्वतः ज्ञान आत्मसात गरजेचे आहे. शिक्षक केवळ मार्ग दाखवू शकतात यातून परिपूर्ण ज्ञान प्राप्त करणे हे केवळ विद्यार्थ्यांच्या हातात असल्याचे डॉ. कवीश्वर पुढे बोलताना म्हणाले. त्यानंतर प्रथम सत्रात मैत्री सेवा संघ इन्स्टिट्यूट ऑफ सोशल वर्क येथील प्रा. केशव वाळके यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे उद्बोधन केले. द्वितीय सत्रात योग शिक्षिका डॉली शाह यांनी मेडिटेशनबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. दुसऱ्या दिवशी ॲड. झांकृती बदानी यांनी मार्गदर्शन केले तर विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. मंगेश पाठक यांनी विद्यार्थी विकासाच्या सर्व योजनांची माहिती दिली. तिसऱ्या दिवशी पद्मिनी जोग यांनी योगाबाबत माहिती दिली. चौथ्या दिवशी ॲड. राधिका बजाज यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच विविध संबंधित विषय शिक्षकांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. शनिवार, दिनांक ५ ऑगस्ट २०२३ रोजी इंडक्शन प्रोग्रामचा समारोप करण्यात आला. समारोपीय कार्यक्रमात सेवानिवृत्त न्यायमूर्ती पी. व्ही. हरदास यांनी विधी अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. विधी अभ्यासक्रमातील विषय कसे, अभ्यास कसा करायचा, गणवेश कसा असावा, सोबतच वकिली व्यवसायातील कोड ऑफ कंडक्टबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्या डॉ. प्रवीणा खोब्रागडे, उपप्राचार्य डॉ. रविशंकर मोर, डॉ. अधरा देशपांडे, समन्वयक प्रा. मृण्मयी कुकडे यांनी सहकार्य केले.

# पदव्युत्तर जनसंवाद विभागात कॅम्पस ड्राईव्ह

**विदर्भातील पत्रकारितेच्या ६० विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर जनसंवाद विभागात रोजगार व प्रशिक्षण सेलच्या सहकार्याने कॅम्पस मुलाखती आयोजित करण्यात आल्या. एबीपी न्यूज नेटवर्क प्रायव्हेट लिमिटेड या माध्यम क्षेत्रातील कंपनीने विभागात सोमवार, दिनांक ७ ऑगस्ट २०२३ रोजी आयोजित कॅम्पस ड्राईव्हमध्ये विदर्भातील एकूण ६० विद्यार्थ्यांनी चाळणी परीक्षा दिली.

एबीपी न्यूज नेटवर्क प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने विद्यापीठाच्या पदव्युत्तर जनसंवाद विभागाला पत्र लिहीत विदर्भातील मास कम्युनिकेशन मधील विद्यार्थ्यांकरीता कॅम्पस मुलाखती घेण्याची इच्छा व्यक्त केली होती. यानुसार विद्यापीठ पदव्युत्तर जनसंवाद विभागाने कॅम्पस मुलाखती आयोजित करीत विदर्भातील विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली. या कॅम्पस मुलाखतीमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांची एबीपी माझा या मराठी न्यूज चॅनल करिता प्रशिक्षणार्थी म्हणून निवड केली जाणार आहे. मास कम्युनिकेशन मधील पदवीचे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना ३.५० लाख रुपये वार्षिक तर पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना चार लाख रुपये वार्षिक पॅकेज दिले जाणार आहे. एबीपी न्यूज नेटवर्क या माध्यम क्षेत्रातील कंपनीने प्रशिक्षणार्थी या पदाकरिता कॅम्पस ड्राईव्हचे आयोजन केले होते. या कॅम्पस ड्राईव्हमध्ये






विद्यापीठाच्या पदव्युत्तर जनसंवाद विभाग, धनवटे नॅशनल कॉलेज नागपूर, सरदार पटेल महाविद्यालय व भारतीय जनसंचार संस्थान अमरावती येथील असे संपूर्ण विदर्भातून विद्यार्थी सहभागी झाले होते. शिक्षण पूर्ण होताच विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी विद्यापीठात रोजगार व प्रशिक्षण विभाग सुरू केला. या विभागामार्फत विद्यापीठातील विविध पदव्युत्तर शैक्षणिक विभाग विभाग त्याचप्रमाणे संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरीता कॅम्पस ड्राईव्ह आयोजित केल्या जात आहे. विद्यार्थ्यांना नोकरीच्या चांगल्या संधी मिळाव्यात म्हणून विद्यापीठाकडून सातत्याने प्रयत्न केला जात आहे. यावेळी पदव्युत्तर जनसंवाद विभागाचे प्रमुख डॉ. मोईज मन्नान हक, रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन, एबीपी न्यूज नेटवर्क मधील एबीपी माझाच्या उपकार्यकारी संपादक सरिता कौशिक, अमरावती आयआयएमसीचे सहा. प्राध्यापक आषिश दुबे, धनवटे नॅशनल कॉलेजमधील श्री. नितीन कराळे उपस्थित होते. कॅम्पस ड्राईव्हमध्ये सर्वप्रथम विद्यार्थ्यांची चाळणी परीक्षा घेण्यात आली. या चाळणी परीक्षेमधून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेत त्यांची ट्रेनी या पदावर निवड केली जाणार आहे. पदव्युत्तर जनसंवाद विभागात आयोजित कॅम्पस ड्राईव्हमध्ये एबीपी न्यूज नेटवर्क मधील प्रॉडक्शन इन्चार्ज राहुल खिचडी, विदर्भ ब्युरो चीफ रजत वशिष्ठ, प्रतिनिधी तुषार कोहळे यांच्याकडून विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. पत्रकारितेमधील विद्यार्थ्यांचा या कॅम्पस ड्राईव्हला मोठ्या संख्येने प्रतिसाद मिळाला.

## विद्यापीठात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती



कथा, कादंबरीकार, कवी, नाट्य कलावंत, लोकशाहीर, साहित्यसम्राट श्री. अण्णाभाऊ साठे यांची जयंती राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात मंगळवार, दिनांक १ ऑगस्ट २०२३ रोजी साजरी करण्यात आली. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनात वित्त व लेखा अधिकारी श्री. हरीश पालीवाल यांनी विद्यापीठाच्या वतीने श्री. अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला हारार्पण केले. यावेळी उपकुलसचिव श्री. प्रदीप बिनीवाले, अधिक्षक शैलेश राठोड, जनसंपर्क अधिकारी प्रेमदास वाडकर, स्वप्निल मोडक, कवडू भोयर, कार्तिक हरडे, दुर्गेश बैस, सुशील मोकलवार, अनिल खरे, आसिफ शेख यांच्यासह अन्य कर्मचारी उपस्थित होते.

## भालाफेकमध्ये सीता, चंद्रजीत, टिना, वंशिता अव्वल

राष्ट्रीय भालाफेक दिवस उत्साहात



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा विभागातर्फे नागपूर जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेच्या सहकार्याने व साई खेलो इंडिया विद्यापीठ केंद्राच्या वतीने राष्ट्रीय भालाफेक दिवसानिमित्त भालाफेक स्पर्धे आयोजन विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅक परिसरात करण्यात आले. या स्पर्धेत विविध वयोगटात वंशिका श्रीवास, टिना रात्रे, चंद्रजीत गायकवाड, सीता मडावी यांनी प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

नीरज चोप्राने ७ ऑगस्ट २०२०-२१ टोकिओ ऑलिंपिक्स मध्ये भारताला पहिल्यांदाच सुवर्ण पदक मिळवून त्या सुवर्ण दिवसाची

आठवण म्हणून या दिवशी राष्ट्रीय भालाफेक दिवस साजरा केला जातो. यानिमित्ताने आयोजित स्पर्धेत महिला खुल्या गटात आकार ॲथलेटिक्स अकादमीच्या सीता मडावीने २२.७८ मीटर अंतर नोंदवित अव्वल स्थान पटकावले. १८ वर्षाखालील मुलांच्या गटात महाकाल फिटनेस अँड स्पोर्ट्स अकादमीचा चंद्रजीत गायकवाडने २१.८२ मीटर भालाफेक फेकत अव्वल स्थान पटकावले. तर दुसरे स्थान याच अकादमीच्या भुपेंद्र मार्कंडेय याने प्राप्त केले. २०.८५ मीटर अंतर त्याने नोंदविले.



मुलींच्या गटात महाकाल फिटनेस अँड स्पोर्ट्स अकादमीच्या टिना रात्रे ने अव्वल स्थान तर दुसरे स्थान तेजस्विनी जोशीने मिळविले. टिनाने १४.२२ आणि तेजस्विनीने १०.१७ मीटर एवढी नोंद केली. बारा वर्षांखालील मुलींच्या गटात महाकाल फिटनेस अँड स्पोर्ट्स अकादमीच्या वंशिका श्रीवासने अव्वल स्थान पटकावले. तर द्वितीय क्रमांक खुशी गुमगावकरने प्राप्त केले. वंशिकाने १२.६५ मीटर तर खुशीने ८.११ मीटर एवढी नोंद केली.

स्पर्धेतील विजेत्यांना विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी, डॉ. शारदा नायडू, नागपूर जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेचे अध्यक्ष गुरुदेव नगराळे, डॉ. अनिल भोरे यांच्या हस्ते यश प्राप्त खेळाडूंचा पदक देऊन सत्कार करण्यात आला. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेचे वरिष्ठ सहसचिव राम वाणी, विनोद पाचघरे, साई खेलो इंडिया केंद्राची अथलेटिक्स प्रशिक्षक सायली वाघमारे, डॉ. विबेकानंद सिंग, गणेश वाणी यांनी प्रयत्न केले.

## 'माझी माती माझा देश' अभियान अंतर्गत शपथ कार्यक्रम

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात 'माझी माती माझा देश' अभियान अंतर्गत शपथ घेण्यात आली.विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील तळमजल्यावरील सभागृहात बुधवार, दिनांक ९ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी १० वाजता आयोजित कार्यक्रमात माननीय प्र-कलगुरु डॉ. संजय दुधे यांनी सर्व शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांना शपथ दिली.

सर्व शासकीय / अशासकीय महाविद्यालय / संस्था तसेच अकृषी विद्यापीठात 'माझी माती माझा देश' या अभियान अंतर्गत सकाळी १० वाजता शपथ घेण्याचे निर्देश शिक्षण संचालकांनी दिले होते. त्यानुसार विद्यापीठाच्या सभागृहात सकाळी दहा वाजता माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी उपस्थितांना शपथ दिली. यावेळी व्यासपीठावर कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांची उपस्थिती होती. भारताला विकसित देश बनविणे आहे. गुलामीच्या मानसिकतेला समूळ नष्ट करणे. देशाच्या समृद्ध परंपरेवर गर्व करणे. एकता आणि एकजूटता याकरिता कर्तव्यबद्ध राहणे. नागरिक म्हणून कर्तव्य निभावणे. देशाची सुरक्षा करणाऱ्यांचा सन्मान करणे तसेच भारताला २०४७ पर्यंत विकसित देश बनविण्याचे स्वप्न साकार करणे अशी शपथ माननीय प्र- कुलगुरूंनी उपस्थितांना दिली. यावेळी वित्त व लेखा अधिकारी श्री. हरीश पालीवाल, नवोपक्रम- नवसंशोधन व





साहचर्य मंडळ संचालक डॉ. राजेश सिंह, विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा डॉ. संजय कवीश्वर, मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांच्यासह विविध विभाग प्रमुख, प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# कोकना / खोबा येथे फॅशन डिझाईन लॅब उद्घाटित

## प्र -कुलगुरू डॉ. संजय दुधे यांच्या हस्ते शुभारंभ






राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व समता फाउंडेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमानाने रूपलता देवाजी कापगते महाविद्यालय कोकना / खोबा येथे फॅशन डिझायनिंग लॅबचे उद्घाटन करण्यात आले. विद्यापीठाचे माननीय प्र- कुलगुरू डॉ. संजय दुधे यांच्या प्रमुख उपस्थितीत फॅशन डिझाईन कोर्सला सुरुवात करण्यात आली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने 'रिच टू अनरीच्ड' उपक्रम राबवित आहे. या उपक्रमांतर्गत विद्यापीठ परिक्षेत्र अंतर्गत येत असलेल्या ग्रामीण भागात रोजगार तसेच स्वयंरोजगाराची साधने नागरिकांना उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केल्या जात आहे. याचाच एक भाग म्हणून महिलांना अद्यावत फॅशन डिझाइनिंगची माहिती मिळावी म्हणून या अभ्यासक्रमाची सुरुवात रूपालता देवाजी कापगते या महाविद्यालयात करण्यात आली. प्र -कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी फॅशन डिझायनिंग कोर्सचे उद्घाटन केले.

यावेळी समता फाउंडेशनच्या वतीने नेत्र तपासणी, चष्मे वाटप, शिव व समता सुविधा केंद्रमार्फत आयुष्मान भारत कार्ड व आभा कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना प्र-कुलगुरु डॉ. दुधे यांनी उपस्थित विद्यार्थी व नागरिकांना मार्गदर्शन केले. ग्रामीण भागात कौशल्य विकासाचे अभ्यासक्रम सुरू करून येथील नागरिकांना रोजगारक्षम करण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न असल्याचे ते म्हणाले. फॅशन डिझाईन अभ्यासक्रमाबाबत समता फाउंडेशनची डीडीटी मास्टर स्मिता कांबळे यांनी सविस्तर माहिती दिली. संस्थेचे सचिव डॉ. देवाजी कापगते व अध्यक्ष रूपलताताई कापगते यांनी फॅशन डिझाईनवर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला आदिवासी आश्रमशाळेचे (माध्य.) मुख्याध्यापक के. एम. गहाणे, समता फाउंडेशनचे पदाधिकारी आहित्य उकरकर, कैलास मरकाम, डॉ. लाडे, डॉ. लांजेवार, संस्थेच्या सदस्य डॉ. निशाताई कापगते, डॉ. रोहिणी कापगते, आर. डी. के. महाविद्यालयाचे समन्वयक पंकज झोळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्र. प्राचार्य बी.के. टेंभुर्णे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन प्राचार्य एम.बी. गायधने यांनी केले तर आभार एल. एन. कापगते यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. आर. के. रहांगडाले, एल.एम. ब्राह्मणकर, लिपिक नरेश शहारे, पी. सी. कुरसुंगे यांनी सहकार्य केले.

# बलिदानाची आठवण म्हणून कार्यक्रमाचे आयोजन

## प्र- कुलगुरू डॉ. संजय दुधे यांचे प्रतिपादन

## विद्यापीठात देशभक्ती व चित्रपट गीत गायन स्पर्धा




देशाच्या स्वातंत्र्यासाठी नागरिकांनी किती बलिदान दिले याची आठवण व्हावी म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन असल्याचे प्रतिपादन माननीय प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग आणि स्वरधारा म्युझिकल यांचे संयुक्त विद्यमाने **'माझी माती माझा देश'** अभियान अंतर्गत विद्यापीठ शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने आणि स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून देशभक्ती आणि चित्रपट गीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. महाराज बाग स्थित छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसरातील दीक्षांत सभागृहात मंगळवार, दिनांक १५ ऑगस्ट २०२३ रोजी पार पडलेल्या कार्यक्रमात डॉ. दुधे मार्गदर्शन करीत होते.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, प्रमुख अतिथी म्हणून अधिसभा सदस्य डॉ. सचिन उंटवाले, संगीत गुरु अकील अहमद, शताब्दी महोत्सव समिती सदस्य डॉ.अनंत पांडे, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ सदस्य धनंजय वेळूकर, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, श्री. प्रवीण भिवगडे व श्री. प्रमोद अंधारे यांची उपस्थिती होती. देशाचे प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून हर घर तिरंगा, 'माझी माती माझा देश' अभियान यशस्वीपणे राबविण्यात आले. त्यांच्या संकल्पनेतून पुढे आलेला योग संपूर्ण जगात पोहोचला. स्वातंत्र्यानंतर फाळणीत देखील न लढता लाखो नागरिकांची प्राणाची आहुती गेली आहे. अनेक कुटुंबे विखुरले गेले, असे श्री. दुधे यांनी पुढे बोलताना सांगितले. महाविद्यालयीनच नव्हे तर शाळा-विद्यालयांमधील विद्यार्थ्यांना खेळासाठी विद्यापीठाने मैदाने उपलब्ध करून दिली आहेत. सुविधा नसलेल्या ग्रामीण भागातील मुलांपर्यंत आपणास पोहोचवायचे आहे. जाणीव असणाऱ्यांनी विद्यापीठाच्या 'ग्राम चलो अभियानात' सहभागी होण्याचे आवाहन डॉ. दुधे यांनी केले. त्याचप्रमाणे विद्यापीठाकडून आंतर शालेय, वंदे मातरम स्पर्धा, बँड स्पर्धा, लेझीम स्पर्धा घेतल्या जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. गीत गायन स्पर्धेसाठी परीक्षक




म्हणून हंबीरराव मोहिते व अहिंसा तिरपुडे यांनी कार्य बघितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. धनंजय वेळूकर यांनी स्पर्धेच्या आयोजनामागील भूमिका विशद केली. कार्यक्रमाची सुरुवात अधिसभा सदस्य डॉ. सचिन उंटवाले यांनी 'ऐ वतन वतन आबाद रहे तू' या गाण्याने केली. डॉ. अनंत पांडे, अधिसभा सदस्य डॉ. सचिन उंटवाले यांनी स्पर्धकांना त्यांच्या भाषणातून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचालन डॉ. आदित्य सोनी व प्रवीण भिवगडे यांनी केले तर आभार डॉ. नितीन जांगिटवार यांनी मानले.









# देशाला समानतेकडे नेण्यातच खरी देशभक्ती

## माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांचे प्रतिपादन

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ स्वातंत्र्य दिन



देशाला समानतेकडे नेण्यातच खरी देशभक्ती असल्याचे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात मंगळवार, दिनांक १५ ऑगस्ट २०२३ रोजी स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महाराज बाग स्थित छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसरात हिरवळीवर माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. देश विकासाचा संकल्प करण्याचे आवाहन माननीय कुलगुरूंनी यावेळी बोलताना केले.

प्रत्येकामध्ये देशाविषयी प्रेम असले पाहिजे. केवळ देशप्रेम असून चालणार नाही तर देशाला स्वावलंबी बनविण्याचा संकल्प आपण या स्वातंत्र्यदिनी केला पाहिजे. देशातील नागरिकांसाठी काय सेवा करता येईल याची उत्कंठा असणे म्हणजे देशभक्ती होय, असे कुलगुरू डॉ. चौधरी पुढे बोलताना म्हणाले. शैक्षणिक क्षेत्रात आपण कार्य करतो आहे. शिक्षक तसेच कर्मचारी म्हणून देशसेवेसाठी कार्य करण्याची आपली कायम तयारी असावी. देशाचे युवा भविष्य ग्रामीण भागात राहतात. मात्र ही युवा शक्ती शहराकडे वळत आहे. ग्रामीण भागात राहणारा बहुतांश भारत सुदृढ होणार नाही, तोपर्यंत देशाचा विकास होणार नाही. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात असताना ग्रामीण भागाच्या उन्नतीबाबत आपणास विचार करावा लागेल. ग्रामीण भागाला स्वावलंबी कसे करता येईल याचा विचार करणे म्हणजे खरी देशभक्ती ठरेल असे कुलगुरू म्हणाले. ग्रामीण व शहरी भागात विषमता आढळून येते. त्यामुळे तेथे उपलब्ध नैसर्गिक संसाधनांचा वापर करून युवकांना रोजगारक्षम कसे करता येईल. त्यांना बौद्धिक दृष्टीने कसे सक्षम करता येईल. ग्रामीण भागाला विषमतेकडून समानतेकडे नेण्याच्या दृष्टीने संकल्प करूया असे कुलगुरू म्हणाले. तत्पूर्वी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रफुल्ल साबळे, वित्त व लेखा अधिकारी श्री. हरीश पालीवाल, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ संचालक डॉ. राजेश सिंह, विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, वाणिज्य व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर, मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, आंतरविद्याशाखीय विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, माजी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय वाटमोडे यांच्यासह विविध शैक्षणिक विभाग प्रमुख, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित मोठ्या संख्येने होते. कार्यक्रमाचे संचालन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांनी केले.







# भारत सरकारच्या क्रीडा सचिव सुजाता चतुर्वेदी यांचा विद्यापीठात सत्कार

## कुलगुरूंसह क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ सदस्यांनी केली चर्चा विद्यापीठ सिंथेटिक ट्रॅकची केली पाहणी



भारत सरकारच्या क्रीडा सचिव सौ. सुजाता दाणी चतुर्वेदी (आयएएस) यांचा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या हस्ते गुरुवार, दिनांक १७ ऑगस्ट २०२३ रोजी सत्कार करण्यात आला. विद्यापीठ अंतर्गत खेळाला अधिक पोषक आणि पूरक वातावरण निर्माण करता यावे याबाबत कुलगुरू आणि क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ सदस्यांनी त्यांच्याशी चर्चा केली.

भारत सरकारच्या क्रीडा मंत्रालय सचिव सौ. सुजाता दाणी चतुर्वेदी (आयएएस) यांनी नागपूरला आल्या असता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला भेट दिली. कुलगुरू कक्षात माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, माजी संचालक डॉ. धनंजय वेळूकर, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ सदस्य श्री. विजय मुनीश्वर यांची चर्चेदरम्यान उपस्थिती होती. विद्यापीठाने स्वनिधीतून आंतरराष्ट्रीय दर्जाचा सिंथेटिक ट्रॅक निर्माण केला असल्याची माहिती माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी क्रीडा सचिवांना दिली. सिंथेटिक ट्रॅक तयार झाला असून त्यामुळे नागपुरातून राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार होणार असल्याचे त्यांनी सांगितले. सोबतच महाराष्ट्र सरकारच्या निधीतून 'मल्टी स्टोरी मल्टी परपज' स्पोर्ट कॉम्प्लेक्स बांधले जाणार असल्याचे यावेळी सांगितले. शहरासह ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सर्वोत्कृष्ट क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेचे नियोजन करताना खेळाडूंच्या निवासाची अडचण होत असल्याचे कुलगुरूंनी क्रीडा सचिव यांच्या निदर्शनास आणून दिले. विद्यापीठात स्पोर्ट होस्टेल असावे असा मानस व्यक्त केला. यावर क्रीडा सचिवांनी याबाबत सविस्तर प्रस्ताव रितसर पाठविण्याच्या सूचना दिल्या.

विद्यापीठ परिक्षेत्रात येणाऱ्या चार जिल्ह्यांच्या ठिकाणी विद्यार्थ्यांना उत्कृष्ट क्रीडा सुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणून विद्यापीठाचा प्रयत्न आहे. प्रत्येक जिल्ह्यातून २५ असे एकूण १०० विद्यार्थ्यांना भविष्यातील खेळाडू घडविण्याचा विद्यापीठ प्रयत्न करीत आहे. आर्थिक कमजोर विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५ हजार रुपये महिना देखील विद्यापीठ देणार असल्याचे कुलगुरूंनी सांगितले. क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ संचालक डॉ. शरद सूर्यवंशी व डॉ. धनंजय वेळूकर यांनी विद्यापीठाच्या वतीने राबविल्या जात असलेल्या विविध खेळ विषयक बाबींची माहिती दिली. विद्यापीठात खेलो इंडियाचे ४ केंद्र असून त्यामध्ये शाळाबाह्य विद्यार्थ्यांची खेळासाठी निवड करण्यात आली. जिल्हा निहाय खेलो इंडिया केंद्र सुरू केल्यास मोठ्या प्रमाणात खेळाडू निर्माण होतील, असे क्रीडा सचिवांच्या निदर्शनास आणून दिले. शिवाय प्रशिक्षकांची समस्या असल्याचे यावेळेस निदर्शनास आणून दिले. सर्व चर्चेअंती क्रीडा सचिव सौ. सुजाता दाणी चतुर्वेदी यांनी याबाबत सविस्तर प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना विद्यापीठाला दिल्या. विद्यापीठाच्या माजी विद्यार्थिनी म्हणून क्रीडा सचिव सुजाता दाणी चतुर्वेदी यांचा कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या हस्ते शाल श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.



## सिंथेटिक ट्रॅकची पाहणी

भारत सरकारच्या क्रीडा सचिव सौ. सुजाता दाणी चतुर्वेदी यांनी विद्यापीठ क्रीडा मैदान परिसरात येथे तयार करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सिंथेटिक ट्रॅकची पाहणी केली. नागपूर शहराच्या मध्यभागी विद्यापीठाच्या मैदानावर आंतरराष्ट्रीय दर्जाची सिंथेटिक ट्रॅक होत असल्याने येथे अथलेटिक्स खेळांना चालना मिळेल अशा क्रीडा सचिव म्हणाल्या. यावेळी त्यांच्या समवेत क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, माजी संचालक डॉ. धनंजय वेळूकर, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ सदस्य श्री. विजय मुनीश्वर, 'SAI' च्या प्रशिक्षक सायली वाघमारे, स्मिता बाकरे यांची उपस्थिती होती.



## समाज बदलला म्हणून कायदा बदलावा लागतो

### सेवानिवृत्त न्यायाधीश किशोर रोही यांचे प्रतिपादन | विद्यार्थ्यांनी कलाकृतीतून उधळले देशभक्तीचे रंग





कायदा बदलला म्हणून समाज बदलत नाही. तर, समाज बदलला म्हणून कायदा बदलावा लागतो, असे प्रतिपादन सेवानिवृत्त न्यायाधीश किशोर रोही यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात देशाच्या ७६ व्या स्वातंत्र्य दिन महोत्सवाच्या निमित्ताने विशेष कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवार, दिनांक १८ ऑगस्ट २०२३ रोजी करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त न्यायमूर्ती रोही बोलत होते.

यावेळी मंचावर सेवानिवृत्त न्यायाधीश किशोर रोही, व्हीएनआयटी येथील मानसशास्त्राचे प्राध्यापक डॉ. योगेश देशपांडे, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. प्रविणा खोब्रागडे, डॉ. अधरा देशपांडे यांची उपस्थिती होती. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने महाविद्यालयाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलाकृतींचे श्री. रोही यांनी कौतुक केले. ब्रिटनमध्ये कोणत्याही प्रकारचा लिखित कायदा नाही. मात्र, त्या ठिकाणी आपल्यापेक्षा अधिक शिस्त आहे. ब्रिटन येथील एक उदाहरण देत त्यांनी शिस्तीचे महत्त्व समजावून सांगितले. मात्र, आपल्याकडे या विपरीत परिस्थिती असल्याचे ते म्हणाले. त्यामुळे स्वयंशिस्त असणे अत्यंत गरजेचे आहे. कायद्याचे विद्यार्थी म्हणून स्वतःमध्ये स्वयंशिस्त निर्माण करा असे आवाहन देखील त्यांनी केले. आजच्या आणि तत्कालीन पिढीमध्ये मोठे अंतर आहे. ५० वर्षांपूर्वी याच सभागृहात एलएलबीचे शिक्षण घेतल्याची आठवण त्यांनी सांगितली. भारतीय स्वातंत्र्य लढा एका दिवसाचा नाही. १८५७ पासून भारतीय स्वातंत्र्य लढा सुरू झाला. ९० वर्षांच्या संघर्षानंतर देशाला स्वातंत्र्य मिळाले, असे न्यायमूर्ती रोही म्हणाले. व्हिएनआयटी येथील मानसशास्त्राचे प्राध्यापक डॉ. योगेश देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संवाद कौशल्यावर अधिक भर देण्याचे आवाहन केले. संवाद कौशल्य जेवढे मजबूत तेवढी तुमची प्रगती असे ते म्हणाले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रस्तुतीला त्यांनी दाद दिली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या चित्रफितीच्या माध्यमातून संविधान सभा ते संविधान निर्मितीचा प्रवास उघडला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अधरा देशपांडे यांनी केले तर अध्यक्षीय भाषण महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. प्रवीणा खोब्रागडे यांनी केले. कार्यक्रमाचे समन्वयन प्रा. मृण्मयी कुकडे व राहुल ढोबळे यांनी केले.




## देशभक्तीपर वातावरण निर्मिती

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रस्तुतीने सभागृहात देशभक्तीपर वातावरण निर्मिती झाली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अन्नपूर्णा, जुई व अभिरुची या विद्यार्थिनींनी तयार केलेली संविधान दर्पण चित्रफीत दाखविण्यात आली. त्यानंतर महाविद्यालयाच्या लीगल रिदमने 'सागरा ने मजसी ने... ते जयस्तुते, वंदे मातरम, मां तुझे सलाम, रंग दे बसंती, सरफरोशी की तमन्ना...' आधी विविध देशभक्तीपर गीतांनी उपस्थितांची मने जिंकली. सान्या चॅटर्जीने मां भारती नृत्य सादर केले. हर्षाली वदेही ने कविता, प्रकल्प दुबे याने अनसूनी कहानी, दिव्या राऊतने भरतनाट्यम, निकिता भादीकर, दिशा साबळे, त्रिवेणी मकरा यांनी नृत्य सादर करीत स्वातंत्र्य समरातील हुतात्म्यांना कला प्रकारातून अभिवादन केले. याच कार्यक्रमात पोस्टर मेकिंग, टी-शर्ट मेकिंग आधी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे संचालन हर्षीता पांडे हिने केले. नील कान्हेरे, श्रेयस काळबांडे, अनुष्का लोखंडे यांच्यासह अन्य विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

## सिंथेटिक ट्रॅकला मिळाला आंतरराष्ट्रीय दर्जा

-वर्ल्ड ॲथलेटिक्सने दिले प्रमाणपत्र






राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅक ला आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त झाला आहे. वर्ल्ड ॲथलेटिक्स संघटनेचे सीईओ जॉन रिडगॉन यांनी सिंथेटिक ट्रॅकला आंतरराष्ट्रीय वर्ग २ ॲथलेटिक्स सुविधायुक्त ट्रॅकचा दर्जा प्राप्त प्रमाणपत्र दिले आहे. रवी नगर चौक स्थित क्रीडा परिसरात अनेक वर्षांच्या प्रयत्नानंतर विद्यापीठाला सिंथेटिक ट्रॅक तयार करण्यात यश आले आहे. वर्ल्ड ॲथलेटिक्स संघटनेचे सीईओ जॉन रिडगॉन यांनी सिंथेटिक ट्रॅकला आंतरराष्ट्रीय वर्ग २ ॲथलेटिक्स सुविधायुक्त ट्रॅकचा दर्जा प्राप्त प्रमाणपत्र दिले आहे. रवी नगर चौक स्थित क्रीडा परिसरात अनेक वर्षांच्या प्रयत्नानंतर विद्यापीठाला सिंथेटिक ट्रॅक तयार करण्यात यश आले आहे.

शताब्दी महोत्सवी वर्ष साजरे करीत असलेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अमरावती मार्गावरील क्रीडा संकुल परिसरात अद्ययावत सिंथेटिक ट्रॅक तयार करण्यात आला आहे. मैदानावर सीसीटीव्ही कॅमेरे, प्रेक्षक गॅलरी दुरुस्ती करण्यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅक ला आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त झाला आहे. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक समिती सदस्य डॉ. धनंजय वेळूकर, ॲथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडियाचे बॅक्टिस डिसूझा, विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक आणि माजी आंतरराष्ट्रीय खेळाडू डॉ. शरद सूर्यवंशी, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता अल्पना पाटणे, उपविभागीय अभियंता अतुल गोटे, सहाय्यक अभियंता वर्षा घुसे, प्रवीण मोरे, कनिष्ठ अभियंता आकाश पगारे, विद्यापीठ अभियंता डॉ पल्लवी गिरी तसेच विद्यापीठाचे तत्कालीन अभियंता शेषराव ताजणे यांचे सिंथेटिक ट्रॅक निर्माण करण्यात मोलाचे योगदान लाभले आहे.

विद्यापीठाच्या या सिंथेटिक ट्रॅकवर ४०० मीटरच्या एकूण आठ लेन आहेत. ट्रॅक्टवर पूर्व दिशेला गोळा फेक आणि भालाफेक तर पश्चिम दिशेला स्पर्धेसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. दक्षिण दिशेला दोन ठिकाणी लांब उडी व तिहेरी उडीसाठी जम्पिंग पीटची व्यवस्था आहे. ट्रॅकवर ट्रिपल चेस प्रकारासाठी विशेष सुविधा आहे. ट्रॅक खराब होण्यापासून रोखण्यासाठी ड्रेनेज सिस्टीम व्यवस्था ही आहे. ट्रॅकवर खेळाडू व तांत्रिक अधिकाऱ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे. ट्रॅकच्या आत कोणीही प्रवेश करू नये, यासाठी सभोवताल तारेची कुंपण टाकण्यात आले आहे. स्पर्धेपूर्वी सरावासाठी मैदानाच्या पूर्व व पश्चिम दिशेला विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. या मैदानावर दिवस- रात्रीचे सामने खेळता येणार आहे. राज्य क्रीडा संकुल बालेवाडी, पुणे नंतर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला प्रमाणित सिंथेटिक ट्रॅक तयार करण्याचा दर्जा प्राप्त झाला आहे. त्यामुळे या सिंथेटिक ट्रॅक वर राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय ॲथलेटिक्स स्पर्धा आयोजित करता येणार आहे.

## ॲथलेटिक्स संघटनेकडून कुलगुरूंचा सत्कार



विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकला आंतरराष्ट्रीय वर्ग २ ॲथलेटिक्स सुविधायुक्त ट्रॅकचा दर्जा प्राप्त झाल्याने नागपूर जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेच्या वतीने माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे उपस्थित होते. जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेचे अध्यक्ष श्री गुरुदेव नगराळे, सभापती उमेश नायडू यांच्या हस्ते कुलगुरूंना प्रमाणपत्राची प्रतिकृती व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेचे वरिष्ठ संयुक्त सचिव रामचंद्र वाणी, संयुक्त सचिव अर्चना कोट्टेवार, कोषाध्यक्ष डॉ. संजय चौधरी, तांत्रिक पंच विनोद पाचघरे, प्रशिक्षक गौरव मिरासे, अंकित भडके, मनोज पुडके, दिशांत वालदे, सायली वाघमारे, गणेश वाणी, नितीन धाबेकर, मोहित सहारे अश्विनी नागुलवार यांच्यासह अन्य उपस्थित होते.

# कुलगुरू डॉ. चौधरी यांनी घेतली माफसूच्या कुलगुरूंची भेट

## -'रिचिंग टू अनरीच्ड' अभियानाबाबत केली चर्चा



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉ. नितीन पाटील यांची भेट घेतली. माफसूच्या कुलगुरू पदी निवड झाल्याने त्यांचे स्वागत केले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे उपस्थित होते.

शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाकडून विद्यापीठ परिक्षेत्रातील जिल्ह्याच्या ग्रामीण भागात स्थानिक नैसर्गिक संसाधनांचा वापर करून स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केल्या जात आहे. या भेटी दरम्यान माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी माफसूचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील यांना 'रिचिंग टू अनरीच्ड' अभियानाबाबत माहिती दिली. या अभियानात माफसू मार्फत कशाप्रकारे सहयोग मिळू शकतो याबाबत निवेदन केले. या भेटी दरम्यान दोन्ही कुलगुरु यांच्या दरम्यान अभियानाबाबत सकारात्मक चर्चा झाली.

# गोसेखुर्द प्रकल्पातील जलपर्णीच्या समस्येतून स्थानिक युवकांसाठी शोधणार रोजगाराच्या संधी

-राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांची माहिती

-'रिच टू अनरीच्ड' उपक्रम अंतर्गत विविध गावांना भेटी



गोसेखुर्द प्रकल्पातील जलपर्णीच्या समस्येतून स्थानिक सुशिक्षित युवकांकरिता रोजगाराच्या संधी शोधणार असल्याची माहिती राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी काही तालुक्यातील बुडीत क्षेत्रातील गावांना दिलेल्या भेटीदरम्यान दिली. शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने विद्यापीठाकडून 'रिच टू अनरीच्ड' अभियान राबविले जात आहे. या अभियानाचा भाग म्हणून माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी गोठणगाव, पांढरगोटा, राजुरी आदी गावांना भेटी देत स्थानिक नागरिकांसोबत संवाद साधला.

या भेटी दरम्यान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या समवेत विद्यापीठाचे आंतरविद्याशाखीय विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, शताब्दी महोत्सव समिती मुख्य समन्वयक डॉ. संतोष कसबेकर उपस्थित होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेत दिलेले ग्रामविकासाचे सूत्र राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ 'रिच टू अनरीच्ड' अभियानाच्या माध्यमातून प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्नरत आहे.





पांढरगोटा येथे कुलगुरू डॉ. चौधरी, अधिष्ठाता डॉ. कडू व डॉ. कसबेकर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर श्री लेमदेव पाटील महाविद्यालयात संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. बाबासाहेब तीतरमारे, संस्थेचे अध्यक्ष डॉ. चक्रधर तीतरमारे, सचिव भोजराज चारमोडे, प्राचार्य डॉ. रणदिवे व प्राध्यापक वर्ग यांनी त्यांचे स्वागत केले. कुलगुरू डॉ. चौधरी यांनी संवाद साधताना गावा-गावातील नैसर्गिक साधन संपत्तीचा उपयोग करीत कच्च्या मालांपासून किंवा टाकाऊ वस्तूंपासून आवश्यक वस्तूंची पुनर्निर्मिती कशी करू शकतो, याबाबत माहिती दिली. देशाला आत्मनिर्भर बनवण्याकरिता गावागावांमध्ये रोजगार निर्मिती कशी करता येईल याबाबत मार्गदर्शन केले. अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचा वसा चालविणे व ग्राम-ग्रामाचा उद्धार करण्याकरिता महाराजांच्या विचाराबद्दल संदेश दिला. डॉ. कसबेकर यांनी गावागावांमध्ये महाविद्यालयातर्फे विविध कार्यक्रमाची आयोजन करण्यात यावे. वृद्धांच्या डोळ्यांच्या समस्या बाबत नेत्र तपासणी, चष्मे वाटप शिबिराचे आयोजन करावे. सिकलसेल असलेल्या तरुण-तरुणीचे तपासणी शिबीर आयोजित करण्याबाबत विचार व्यक्त केले.




## विदर्भातून सर्वाधिक पेटंट प्राप्त करणारे डॉ. संजय ढोबळे यांचा सन्मान

विदर्भामधून सर्वाधिक ५२ पेटंट प्राप्त करणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. संजय ढोबळे यांचा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. व्हिजन नेक्स्ट संस्थेच्या वतीने आयोजित बौद्धिक संपदा एकस्व (पेटंट) महोत्सवात डॉ. ढोबळे यांना हा सन्मान मिळाला.

विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. संजय ढोबळे यांच्या नावे एकूण ५२ पेटंट आहेत. भौतिकशास्त्र व अन्य विषयांवर विदर्भातून तब्बल ५२ पेटंट प्राप्त करीत डॉ. ढोबळे हे अग्रस्थानी आहेत. त्यामुळे डॉ. ढोबळे यांचा विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, आमदार कृष्णा खोपडे, विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी, माझी महापौर तथा व्हिजन नेक्स्टचे प्रमुख संदीप जोशी ज्यांच्या उपस्थितीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. त्यामुळे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# औषधी निर्माणशास्त्र विभागात संशोधन लॅब उद्घाटित

-कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या हस्ते उद्घाटन





राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील औषधी निर्माणशास्त्र विभागात संशोधन प्रयोगशाळेचे उद्घाटन माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले. नव्याने नूतनीकरण करण्यात आलेल्या प्रयोगशाळेचा उद्घाटन समारंभ मंगळवार, दिनांक २२ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी ११ वाजता पार पडला.

औषधी निर्माणशास्त्र हा विभाग विद्यापीठातील जुन्या विभागांपैकी आहे. मध्यंतरीच्या काळात औषधी निर्माणशास्त्र विभागातील उपकरणे जुनाट झाली होती. माजी विद्यार्थ्यांनी विभागाला भेट दिली होती. त्यावेळी माजी विद्यार्थी संघटनेने विभागाचा कायापालट करण्याचा निर्धार व्यक्त केला होता. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रशासन, विभाग प्रमुख डॉ. प्रमोद खेडेकर व त्यांचे सर्व सहकाऱ्यांनी एकत्र येत या बदलास सुरुवात केली. औषधी निर्माण शास्त्र विभागातील सर्वच विभागांचे नूतनीकरण केले जात आहे. तळमजल्यावर असलेली औषधी निर्माण संशोधन प्रयोगशाळा नूतनीकरणानंतर सज्ज झाली आहे. या नूतनीकरण झालेल्या संशोधन प्रयोगशाळेचे उद्घाटन माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी फित कापून केले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रफुल्ल साबळे, वित्त व लेखा अधिकारी श्री. हरीश पालीवाल, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर, मुंबई येथील जीवन विद्या मिशनचे माजी अध्यक्ष डॉ. दिलीप पटवर्धन, एआयसीटीई सल्लागार-१ डॉ. राजेंद्र काकडे, नीतिका फार्माचे संचालक डॉ. रवलीन खुराणा, विभाग प्रमुख डॉ. प्रमोद खेडेकर, डॉ. प्रकाश ईटणकर, डॉ. निशिकांत राऊत, डॉ. दादासाहेब कोकरे, डॉ. रिता वडेतवार यांच्यासह अन्य उपस्थित होते. नूतनीकरण झालेल्या संशोधन प्रयोगशाळेत अत्याधुनिक उपकरणे स्थापित करण्यात आली आहे. या अत्याधुनिक उपकरणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अचूक संशोधन करणे शक्य होणार आहे. विविध खोल्यांमध्ये असलेली विविध उपकरणांबाबत माहिती डॉ. रिता वडेतवार यांनी कुलगुरू यांच्यासह अन्य प्रमुख अतिथींना दिली.



# जीवन कौशल्य महत्वपूर्ण - डॉ. दिलीप पटवर्धन

- विद्यापीठ औषध निर्माणशास्त्र विभागात व्याख्यान
- यशासाठी जीवन कौशल्य अभ्यासक्रमास सुरुवात




यशस्वी जीवन तसेच समाजाच्या उन्नतीसाठी जीवन कौशल्य महत्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन मुंबई येथील जीवन विद्या मिशनचे माजी अध्यक्ष डॉ. दिलीप पटवर्धन यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या औषधी निर्माणशास्त्र विभागात 'यशासाठी जीवन कौशल्य' हा २ क्रेडिटचा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. जीवन कौशल्यावर आधारित असलेल्या अभ्यासक्रमास औषधी निर्माणशास्त्र विभागातील डॉ. ए. के. डोरले सभागृहात मंगळवार, दिनांक २२ ऑगस्ट २०२३ रोजी सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून डॉ. पटवर्धन मार्गदर्शन करीत होते.

माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे होते. व्यासपीठावर जीवन विद्या मिशनचे माजी अध्यक्ष डॉ. दिलीप पटवर्धन, एआयसीटीइचे सल्लागार-१ डॉ. राजेंद्र काकडे, नीतिका फार्माचे संचालक डॉ. रवलीन खुराणा, औषधी निर्माण शास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रमोद खेडेकर, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग संचालक डॉ. निशिकांत राऊत, अभ्यासक्रम समन्वयक डॉ. प्रकाश ईटणकर व डॉ.




दादासाहेब कोकरे उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना डॉ. पटवर्धन यांनी इंग्रजी ही शिकण्याची तर मातृभाषा ही हृदयाची भाषा असल्याचे सांगितले. मातृभाषेतून दिलेले शिक्षण विद्यार्थ्यांना लवकर समजते. जगाला ज्या ज्ञानाची गरज आहे ते ज्ञान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून देणार असल्याचे डॉ. पटवर्धन यांनी सांगितले. देशामध्ये शांती स्थापित करणे आणि जगात भारत प्रगती पथावर असावा असे दोन महत्त्वपूर्ण उद्देश या अभ्यासक्रमाचे आहे. पौर्वात्य आणि पाश्चिमात्य अशा दोन संस्कृती आहे. पाश्चिमात्य संस्कृतीमध्ये समाज भौतिकतेकडे वळल्याचे दिसून येते तर पौर्वात्य संस्कृतीत जीवन जगण्यात समतोल राखण्यात आल्याचे दिसून येते. या अभ्यासक्रमामध्ये भगवद्गीता, ज्ञानेश्वरीचा आधार घेतला आहे. वामनराव पै यांनी स्वतः केलेल्या चिंतन आणि व्यावहारिक अनुभवातून जीवनविद्या तयार झाली आहे. विविध महाविद्यालयांमध्ये हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम व जीवनमूल्य निर्माण करण्यावर अभ्यासक्रमात भर दिला आहे. संपूर्ण शास्त्रीय व तर्कशुद्ध ज्ञान यात आहे. देशाला उंच पातळीवर नेण्यासाठी युवा पिढी तयार करणे हे अभ्यासक्रमाचे लक्ष्य असल्याचे डॉ. पटवर्धन म्हणाले. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. रवलीन खुराणा यांनी माजी विद्यार्थी संघटनेच्या वतीने विभागात बऱ्याच नवीन गोष्टी घडत असल्याचे सांगितले. चांगली वृत्ती, कौशल्य आणि ज्ञान असल्यास यशस्वी होता येते. कौशल्य आणि ज्ञान कुठेही प्राप्त करता येते. मात्र चांगली वृत्ती असणे गरजेचे असल्याचे खुराणा म्हणाले. यावेळी एआयसीटीई चे सल्लागार डॉ. राजेंद्र काकडे यांनी नवीन शैक्षणिक धोरणात कौशल्यावर अधिक भर देण्यात आला असल्याचे सांगितले. जगात आपल्या देशात केवळ ५ टक्के कौशल्य प्राप्त नागरिक आहे. अमेरिकेत हेच प्रमाण ९५ टक्के एवढे आहे. अमेरिका, कोरिया, जपान आदी देशांमध्ये मातृभाषेतून शिक्षण दिले जाते. त्यामुळे एनइपीमध्ये भारतीय ज्ञान परंपरा याचा समावेश केला आहे. देशातील विद्यार्थ्यांना मातृभाषेतून उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे म्हणून १० भाषांमध्ये भाषांतर प्रणाली तयार केली आहे. भारतीय ज्ञान परंपरा सर्वाधिक चांगली असल्याचे काकडे म्हणाले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. रिता वडेतवार यांनी केले तर आभार डॉ. दादासाहेब कोकरे यांनी मानले. कार्यक्रमाला परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रफुल्ल साबळे, वित्त व लेखा अधिकारी श्री. हरीश पालीवाल, नवोपक्रम, नवसंशोधन व सहचार्य मंडळ संचालक डॉ. राजेश सिंह, आयक्युएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य यांच्यासह विभागातील शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व जीवन साधना परिवारातील सदस्य उपस्थित होते.

## भारतीय ज्ञान जीवनाला आकार देते - डॉ. संजय दुधे



भारतीय ज्ञान जीवनाला आकार देते असे प्रतिपादन प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी अध्यक्षीय भाषणातून केले. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात भारतीय ज्ञान परंपरेचा (आयकेएस ) समावेश केला आहे. भारतीय ज्ञान परंपरेत भगवद्गीता, ज्ञानेश्वरी, ग्रामगीता याचप्रमाणे विविध तत्ववेत्यांच्या व्यक्तींच्या ज्ञानाचा समावेश केला आहे. अध्यात्म केवळ पूजा पाठासाठीच नाही तर भारतीय अध्यात्म हे मूल्यावर अधिक आधारित असल्याचे डॉ. दुधे म्हणाले. ज्ञान हे पंचतत्व असून जीवनविद्या ही पंचगुणांवर आधारित आहे. चांगले विचार ठेवावे. चांगले वातावरण निर्माण होईल, असे दुधे म्हणाले.

## पीपीटीद्वारे अभ्यासक्रमाची माहिती




मुंबई येथील जीवन विद्या मिशनचे माजी अध्यक्ष डॉ. दिलीप पटवर्धन यांनी 'यशासाठी जीवन कौशल्य' या अभ्यासक्रमाबाबत विशेष कार्यक्रमात माहिती दिली. उद्घाटनिय कार्यक्रम संपल्यानंतर पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन द्वारे डॉ. पटवर्धन यांनी अभ्यासक्रमासंदर्भात सविस्तर माहिती दिली. औषधी निर्माणशास्त्र विभागाने सुरू केलेल्या २ क्रेडिटच्या अभ्यास क्रमातून विद्यार्थ्यांना राष्ट्रप्रेम तसेच नैतिकतेचे धडे मिळणार आहे. याबाबत त्यांनी पीपीटीद्वारे उपस्थितांना माहिती दिली.

## श्री शिवचरित्र ग्रंथ प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधेंना भेट

### -रविंद्र पाटील, भारती साठे यांनी केली चर्चा



वेध रायगडाचा प्रतिष्ठानच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेला श्री शिवचरित्र पुष्पांजली ग्रंथ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांना भेट देण्यात आला. यावेळी इतिहास प्रबोधन संस्थेचे श्री. रवींद्र पाटील, शब्दप्रभू प्रकाशनाच्या संचालिका भारती साठे, सह्याद्री भोगे यांची यावेळी उपस्थिती होती.

वेध रायगडाचा प्रतिष्ठान या इतिहासात काम करणाऱ्या संघटनेच्या वतीने आणि शब्दप्रभू प्रकाशनाच्या वतीने प्रसिद्ध केलेला महाराष्ट्रातील एकूण ९५ लेखक असलेल्या ग्रंथाचे त्यांच्या हस्ते विमोचन करण्यात आले आहे. ब्राह्मी, पाली, मोडी, मराठी, हिंदी, संस्कृत इत्यादी भाषांचा समावेश असलेल्या लेखांचा या ग्रंथात समावेश आहे. या ग्रंथात छत्रपती शिवरायांच्या आयुष्यातील काही घटना, काही धोरणे, काही सहकारी, काही, किल्ले, त्याचे भावविश्व, राजांचे आपल्या घरातील नात्यामध्ये असलेले भावनिक संबंध या विषयाचा विचार विमर्श महाराष्ट्रातील लेखकांनी या ग्रंथात मांडण्याच्या प्रयत्न केला आहे. अतिथी संपादक म्हणून श्री धीरज मोहिते आणि श्री कुणाल मालुसरे यांनी आपले सहकार्य दिले. सह संपादक म्हणून प्राचार्य डॉ. लता मोरे सुरवाडे आणि प्रा. डॉ. जयश्री शास्त्री (चंद्रपूर) यांनी काम पाहिले. तान्हाजी मालुसरे यांचे वंशज श्री. कुणाल मालुसरे हे पुस्तक विमोचनाच्या वेळी उपस्थित होते. श्रीमंत रघुनाथ राजे निंबाळकर यांच्या हस्ते फलटण येथे ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. त्यांनी आपले विचार व्यक्त करताना फलटण संस्थांचा इतिहास, वनगोजी नाईक निंबाळकर यांचे पासून महादजी नाईक निंबाळकर यांचे पर्यंतचा पराक्रमाचा इतिहास मांडला. त्याच वेळी एतिहासिक व्यक्तीबाबत मधल्या काळात झालेल्या बदनामीबद्दल खंत देखील व्यक्त केली. वेध रायगडाचा प्रतिष्ठानने आव्हान पेलेले पाहिजे. भविष्यात राजघराण्यातील व्यक्ती विषयी कुणी भाष्य करणार नाही, याची देखील काळजी आणि खबरदारी घेतली पाहिजे. खोटा इतिहास पेरण्याचे काम जे सुरू आहे. ते इतिहासाला मारक आहे. अश्या अनेक इतिहासाच्या आठवणी सांगत असताना इतिहासातील काही गोष्टी प्रश्नचिन्ह आणि शंका देखील उपस्थित केली.





## पदव्युत्तर विधी विभागात 'माझी माती माझा देश' अभियान

**- न्यायव्यवस्थेतून सोडवा समाजाच्या समस्या - डॉ. कडू**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर विधी विभागात 'माझी माती माझा देश' अभियान राबविण्यात आले. विभागात आयोजित कार्यक्रमात माजी सैनिकांचा शुक्रवार, दिनांक २५ ऑगस्ट २०२३ रोजी सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून मार्गदर्शन करताना आंतरविद्याशाखीय विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांनी न्यायव्यवस्थेतून समाजाच्या समस्या सोडविण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले.



माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरविद्याशाखीय विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांनी कार्यक्रमाची अध्यक्षता केली. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून भारतीय वायुसेनेतील फ्लाईट इंजिनियर, माजी वॉरंट ऑफिसर श्री. लक्ष्मीकांत नांद्रुरकर, भारतीय सेनेतील माजी मानद कॅप्टन, सुभेदार मेजर श्री. संजय खंडारे, भारतीय नेव्हीचे माजी इलेक्ट्रिकल आर्टिफिशर (रेडिओ) श्री. शशिकांत मेनकुंडले, पदव्युत्तर विधी विभागप्रमुख डॉ. पायल ठावरे, कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. गिरीश कुलकर्णी, एमबीए विभाग प्रमुख डॉ. अनंत देशमुख, डॉ. राहुल खराबे, उपस्थित होते. सर्वप्रथम देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने आयोजित 'माझी माती माझा देश' अभियान अंतर्गत पंचप्राण प्रतिज्ञा घेण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना विभाग प्रमुख डॉ. पायल ठावरे यांनी 'माझी माती माझा देश' अभियान बाबत माहिती दिली. या अभियान अंतर्गत सीमेवर देशाचे रक्षण केलेल्या माजी सैनिकांचा सन्मान करता आला, अशी भावना व्यक्त केली. कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण करताना डॉ. प्रशांत कडू यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत माहिती दिली. विद्यापीठ परिक्षेत्रातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्याचे प्रयत्न त्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देत विद्यापीठाकडून केले जात आहे. शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने विद्यापीठाकडून 'ग्राम चलो अभियान' राबविले जात आहे. या अभियानात विधी विभागातील विद्यार्थ्यांनी देखील प्रत्यक्ष फिल्डवर जात ग्रामीण भागातील समाज जीवन समजून घेणे आवश्यक आहे. त्यांना निदर्शनास आलेल्या समस्यांची सोडवणूक न्याय व्यवस्थेच्या माध्यमातून कशी करता येईल याकडे त्यांनी विद्यार्थ्यांचे लक्ष वेधले.

यावेळी भारतीय वायुसेनेतील माजी फ्लाईट इंजिनियर, वॉरंट ऑफिसर श्री. लक्ष्मीकांत नांद्रुरकर यांनी 'देशभक्ती सर्वोपरी' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. भारतीय सेनेतील माजी मानद कॅप्टन, सुभेदार मेजर श्री. संजय खंडारे यांनी संरक्षण सेवेत सामील होण्याचे स्वरूप याबाबत मार्गदर्शन केले तर भारतीय नेव्ही दलातील माजी इलेक्ट्रिकल आर्टिफिशर (रेडिओ) श्री. शशिकांत मेनकुंडले यांनी विद्यार्थ्यांसमोर ते स्वातंत्र्य मिळेपर्यंतचा संपूर्ण इतिहास मांडला. कार्यक्रमाचे संचालन शिवानी खंडाते हिने केले तर आभार डॉ. विजयता उईके यांनी मानले. कार्यक्रमाला विभागातील शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# टीसीएस मध्ये १३६ विद्यार्थ्यांची निवड
## -विद्यापीठ रोजगार व प्रशिक्षण विभागाचे आयोजन






राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या रोजगार व प्रशिक्षण विभागाच्या माध्यमातून आयोजित रोजगार मेळाव्यात टीसीएस कंपनीने १३६ विद्यार्थ्यांची निवड केली आहे. यामध्ये टीसीएस मिहान येथे ११३ तर भंडारा येथील रोजगार मेळाव्यातील २३ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या रोजगार व प्रशिक्षण विभागाच्या माध्यमातून टीसीएस मिहानकडून गुरुवार, २४ ऑगस्ट रोजी नागपूर मिहान येथे तर शनिवार २६ ऑगस्ट २०२३ रोजी भंडारा येथील जे. एम. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात रोजगार मेळावा आयोजित केला होता. नागपूर येथील मेळाव्याला ५१२ विद्यार्थी उपस्थित होते. लिखित परीक्षेनंतर ११३ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. भंडारा येथील मेळाव्याला २५० विद्यार्थी उपस्थित होते. यामधून २३ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनात विद्यापीठात रोजगार व प्रशिक्षण कक्ष सुरू करण्यात आला आहे. या कक्षाच्या माध्यमातून विद्यापीठातील विभाग तसेच संलग्नित महाविद्यालयातील शिक्षण पूर्ण होताच विद्यार्थ्यांना मेळाव्यातून रोजगार मिळवून देण्याचे प्रयत्न सुरू आहे.

टीसीएस मिहानकडून बीपीएस ग्रॅज्युएट पदाकरिता हा रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. रोजगार मेळाव्यात सहभागी होण्याकरिता २०२१, २०२२ व २०२३ मध्ये बीए, बीकॉम, बीएएफ, बीबीआय, बीबीए, बीबीएम, बीएमएस, बीएसस्सी (सीएस/आयटी वगळता) आदी पदवीचे शिक्षण आवश्यक होते. नुकतेच पदवीचे शिक्षण झालेले तसेच ०-३ महिन्यांचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात आले. रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून शॉर्टलिस्ट झालेल्या विद्यार्थ्यांचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे व रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन यांनी अभिनंदन केले आहे.

# नागपूरला क्रीडा हब बनविण्यासाठी पुढाकार
# माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांचे प्रतिपादन
## वर्धा येथे वार्षिक पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ ग्रामीण भागातील खेळाडू विद्यार्थ्यांना प्रशिक्षण तसेच आर्थिक मदतीचा हात देत आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचा सिंथेटिक ट्रॅक पूर्णत्वास आला असून आणखी अन्य सुविधा उपलब्ध करून देत नागपूरला क्रीडा हब बनविण्यासाठी विद्यापीठ पुढाकार घेत असल्याचे प्रतिपादन माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा वार्षिक उत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार वितरण सोहळा वर्धा येथील यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचे यशवंत महाविद्यालय येथे



रविवार, दिनांक २७ ऑगस्ट २०२३ रोजी पार पडला. यावेळी अध्यक्षस्थानावरून डॉ. चौधरी मार्गदर्शन करीत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी होते. प्रमुख पाहुणे म्हणून यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर देशमुख, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजू हिवसे, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सोपानदेव पिसे, यशवंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्र बेले, विद्यापीठ शारीरिक शिक्षण मंडळाचे सदस्य डॉ. धनंजय वेळूकर, नितीन जांगिटवार उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुणे यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर देशमुख यांनी मार्गदर्शन करताना क्रीडा क्षेत्रात प्रगती करण्याच्या विविध संधी असल्याचे सांगितले. खेळाडू विद्यार्थ्यांना संधी मिळावी म्हणून विद्यापीठाकडून पुढाकार घेतला जात असून ही महत्त्वाची बाब आहे. विद्यार्थ्यांनी खेळाला समर्पित झाले पाहिजे असेही ते म्हणाले.

खेलो इंडिया, आंतरविद्यापीठ स्पर्धा व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत प्राविण्य प्राप्त करीत विद्यापीठाचे नावलौकिक वाढविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार या कार्यक्रमात प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आला. यामध्ये वैभव तिमांडे, शुभम वंजारी, पूजा आमटे, राधिका तिवारी, अश्लेषा वर्मा, शिवानी दिवासे, अंकित खत्री, रुचिका टेंभरे, माधवी वानखेडे, करमवीर इत्यादी ४३ विद्यार्थ्यांना रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. त्याचप्रमाणे वर्धा जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा देखील सत्कार करण्यात आला. यामध्ये आर्या कोकणे (आंतरराष्ट्रीय धावपटू वय ७ वर्ष), प्रतीक वानखेडे (आंतरराष्ट्रीय लाठीकाठी खेळाडू), रामरावजी किटे (आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू व पंच), डॉ. जयंत बुरांडे ( प्रशिक्षक), डॉ. अमित खांडेकर (व्हॉलीबॉल) इत्यादींचा विशेष कर्तृत्वाबद्दल सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयातील संगीत विभागाच्या विद्यार्थ्यांनी विभाग प्रमुख प्रा. अरूणा हरले यांच्या मार्गदर्शनात महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीत सादर केले. कॅप्टन आर. ए. भालेकर यांच्या नेतृत्वात एनसीसीच्या छात्रांनी प्रमुख अतिथींना मानवंदना दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शरद सूर्यवंशी यांनी केले. संचालन डॉ. मंदा ठेंगणे यांनी केले तर आभार प्रा. किरण काळे यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ. किशोर पोफळी, डॉ. मदन इंगळे, प्रा. राजू निखाडे, डॉ. धनराज मुगल प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. प्रफुल्ल काळे, प्रा. निकिता निर्मळ यांनी सहकार्य केले.



# समर्पण दिले तरच फोटोग्राफी क्षेत्रात यश

## प्रसिद्ध छायाचित्रकार शेखर सोनी यांचे प्रतिपादन

## ललित कला विभागात फोटोग्राफी प्रदर्शनीचे उद्घाटन

समर्पण दिले तरच फोटोग्राफी क्षेत्रात यश प्राप्त करता येते असे प्रतिपादन सुप्रसिद्ध छायाचित्रकार शेखर सोनी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ललित कला विभागात शताब्दी महोत्सवी वर्ष आणि 'माझी माती माझा देश' अभियान अंतर्गत फोटोग्राफी प्रदर्शनीचे आयोजन केले आहे. ललित कला विभागात आयोजित फोटोग्राफी प्रदर्शनीचे उद्घाटन करताना शुक्रवार दिनांक २५ ऑगस्ट २०२३ रोजी प्रमुख अतिथी सोनी मार्गदर्शन करीत होते.




मंचावर कार्यक्रमाच्या अध्यक्षा ललित कला विभाग प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात, सुप्रसिद्ध छायाचित्रकार शेखर सोनी, संयोजक डॉ. हरिश वाळके, प्रा. रुचिता अटाळकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला 'माझी माती माझा देश' अभियानांतर्गत विभागाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर सर्वांनी पंचप्राण प्रतिज्ञा घेतली. प्रमुख अतिथी शेखर सोनी यांच्या हस्ते छायाचित्र प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले. फोटोग्राफी प्रदर्शनी सोमवार, दिनांक २८ ऑगस्ट २०२३ पर्यंत सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. यावेळी पुढे बोलताना शेखर सोनी यांनी जागतिक फोटोग्राफी दिवस का साजरा केला जातो?. किती वर्षांपासून साजरा केला जातो? अशी मूलभूत माहिती छायाचित्रकाराला असणे गरजेचे असल्याचे सांगितले. चंद्रयान ३ ने चंद्राचा फोटो पाठविला. या फोटो वरून चंद्रयान हे चंद्रावर पोहोचल्याचे समजणे शक्य झाले. त्यामुळे फोटोचे फार महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले. देशात अनेक नामवंत छायाचित्रकार आहेत. १० छायाचित्रकारांना देशातील सर्वोच्च पद्मश्री असा पुरस्कार देखील मिळाला आहे. छायाचित्रकारांना रोजगाराच्या अनेक संधी आहेत. स्पर्धेतूनच यशाची भावना निर्माण होत असल्याचे सोनी पुढे बोलताना म्हणाले. यावेळी अध्यक्षीय भाषण करताना विभाग प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात यांनी फोटोग्राफी जीवनातील महत्त्वपूर्ण क्षण टिपत असल्याचे सांगितले. कॅमेऱ्याने टिपलेले क्षण आयुष्यामध्ये परत येत नाही. जेव्हा आपण छायाचित्र पाहतो तेव्हा आठवणीत रमतो. पूर्वी स्टुडिओत जात फोटो काढले जात होते. मात्र, आता प्रत्येकाच्या हातामध्ये कॅमेरे आले आहेत. फोटोग्राफीत अनेक संभावना असून यात सर्व कलांचे मिश्रण असल्याचे थोरात म्हणाल्या. यावेळी पप्पूच्या स्टुडिओचे उदाहरण देखील त्यांनी त्यांच्या भाषणात दिले. तत्पूर्वी विभागातील विवेक मिस्त्री, विजय जथे, नासिर शेख, निखिल टोंगळे, राजश्री उपाध्ये, राजू वानखडे, दीक्षा ढोमणे आदी विद्यार्थ्यांनी गीतांच्या माध्यमातून सुंदर प्रस्तुती सादर केली. कार्यक्रमाचे संचालन डॉ. हरीश वाळके यांनी केले तर आभार विद्यार्थिनी नम्रता भारती हिने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. अमोल गुल्हाने, डॉ. सदानंद चौधरी, डॉ. स्नेहल लिमये, प्रा. मौतिक काटे, प्रा. मनोज चोपडे, प्रा. महेश मानकर, प्रा. पियुष धुमकेकर, प्रा. हर्षद सालपे, प्रा. नाना मिसाळ, उज्वला धंदरे, रवींद्र हरडे यांनी सहकार्य केले.





# नवीन शैक्षणिक धोरणाबाबत जागरूकता कार्यक्रम

पदव्युत्तर विधी विभाग, व्यवसाय प्रबंधन विभाग आणि
भूगर्भशास्त्र विभाग यांचा संयुक्त उपक्रम

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील पदव्युत्तर विधी विभाग, व्यवसाय प्रबंधन विभाग आणि भूगर्भशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने व्यवसाय प्रबंधन विभागाच्या सभागृहात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ते राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताह समजून घेण्यासाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) जागरूकता कार्यक्रमाला तज्ञ व्याख्याते म्हणून बिंझानी महाविद्यालयाचे प्राचार्य व दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजचे माजी संचालक डॉ. सुजित मेत्रे उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर डॉ. अनंत देशमुख, डॉ. सुजित मेत्रे, डॉ. पोफरे व डॉ. पायल ठावरे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात शिवानी खंडाते यांनी प्रमुख अतिथींच्या स्वागताने केली. कार्यक्रमात NEP चे महत्त्व, शिक्षक शिकवतात पण, विद्यार्थी शिकतात की नाही?, विशेषतः विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष शिकण्यावर भर देण्यात आला असल्याची माहिती बिंझानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुजित मेत्रे यांनी दिली.

मेत्रे यांनी नवीन शैक्षणिक धोरण आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यातील फरक स्पष्ट केला. नवीन शैक्षणिक धोरणातील या बदलाची आवश्यकता स्पष्ट केली. NEP 2020 च्या सुरळीत अंमलबजावणीसाठी शैक्षणिक संस्थांना तोंड द्यावे लागत असलेल्या अंमलबजावणीतील अडथळ्यांवर प्रकाश टाकला. त्यांनी धोरणाच्या सकारात्मक बाजूंचा उल्लेख केला तसेच संस्थेबाहेरील विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रम, कौशल्य वृद्धिंगत अभ्यासक्रम इत्यादींच्या मदतीने 40% क्रेडिट्स मिळवू शकतात,असे सांगितले. विद्यार्थी सध्या जे काही करत आहेत, उदाहरणार्थ, योग किंवा इतर कोणतेही उपक्रम त्यांच्या क्रेडिटमध्येच योगदान देतील, त्यामुळे शैक्षणिक व्यतिरिक्त कोणतीही क्रिया व्यर्थ जाणार नाही असे ते म्हणाले.

डॉ. पायल ठावरे यांनी NEP 2020 हे शिक्षण विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धेसाठी तयार करण्यासाठी असल्याचे सांगितले. ४ वर्षांचा पदवी अभ्यासक्रम का आवश्यक आहे. या व्यतिरिक्त विभाग अचूक अंमलबजावणीसाठी प्रयत्न करीत असल्याचे त्या म्हणाल्या. अंमलबजावणीची ही प्रक्रिया सुरुवातीच्या टप्प्यात आहे आणि अंमलबजावणीतील त्रुटींच्या उपस्थितीचे विश्लेषण करण्यासाठी आम्हाला प्रतीक्षा करावी लागेल, असे ठावरे यांनी सांगितले. व्याख्यानानंतर प्रमुख अतिथिंनी विद्यार्थ्यांसोबत या विषयावर चर्चा केली. विद्यार्थ्यांनी देखील त्यांना येणाऱ्या अडचणींबाबत अतिथींना प्रश्न विचारून त्याचे समाधान शोधण्याचा प्रयत्न केला. यावेळी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सकता दिसून आली. कार्यक्रमाच्या आयोजनात पदव्युत्तर विधी विभागातील डॉ. विजयता भलावे उईके यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. कार्यक्रमाला विद्यापीठाचा पदव्युत्तर विधी विभाग, पदव्युत्तर व्यवसाय प्रबंधन विभाग, भूगर्भशास्त्र विभागातील शिक्षक तसेच १०० पेक्षा अधिक विद्यार्थी उपस्थित होते.

## आदिवासींच्या सांस्कृतीक जीवनात शाश्वत विकासाची मुळे - डॉ. शैलेंद्र लेंडे
## विद्यापीठ समाजशास्त्र विभागात आदिवासी दिवस

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागात गुरुवार, दिनांक १० ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी ११ वाजता जागतिक आदिवासी दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी मराठी विभाग प्रमुख डॉ शैलेंद्र लेंडे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते.



वसाहतवादापासून आदिवासी समूह हा सामाजिक शोषणाचा बळी पडला आणि विकास प्रक्रीयेत मागास होत गेला. असे असले तरी तत्कालीन शाश्वत विकासाची कास घेतलेल्या जगाला आदिवासींच्या सांस्कृतिक जीवनाचा मागोवा घ्यावा लागेल, असे मत डॉ. लेंडे यांनी व्यक्त केले. जल, जंगल, जमीन यांचे रक्षण, संरक्षण करणाऱ्या आदिवासीच्या हक्काच्या संरक्षणासाठी सर्वांनी एकजूट होण्याची गरज आहे. त्यासाठी आपण पुढे यायला पाहिजे, असे आवाहन सुद्धा केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान समाजशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. अशोक बोरकर यांनी भूषवले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना त्यांनी विभागात सुरू झालेल्या समाजकार्य (व्यावसायिक पदव्युत्तर पदवी) विषयात प्रवेश प्रक्रिया सुरू असून विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने प्रवेश घ्यावा जेणेकरून व्यवसायाच्या विविध संधी उपलब्ध होतील, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन समाजशात्राच्या अध्यापिका हिना नागभिरे यांनी केले तर आभार डॉ. नितीन कायरकर यांनी मानले. याप्रसंगी समाजशास्त्र आणि समाज कार्याचे विद्यार्थी बहूसंख्येने उपस्थित होते.

## विद्यापीठात संविधान प्रास्ताविका पार्क समितीची बैठक

### संविधान प्रास्ताविका पार्कचे काम तातडीने पूर्ण करावे
### कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी त्याचप्रमाणे एनएमआरडीएचे अधिकारी आणि संबंधितांना सूचना

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाच्या प्रांगणात निर्माणाधीन असलेल्या संविधान प्रास्ताविका पार्कची कामे तातडीने पूर्ण करावे, अशा सूचना माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी त्याचप्रमाणे एनएमआरडीएचे अधिकारी आणि संबंधितांना दिल्या. संविधान प्रास्ताविका पार्क समितीची बैठक विद्यापीठात सोमवार, दिनांक १४ ऑगस्ट २०२३ रोजी पार पडली. यावेळी कुलगुरू डॉ. चौधरी बोलत होते. बैठकीमध्ये पार्कच्या प्रगती बाबत आढावा घेण्यात आला.

बैठकीला संविधान प्रास्ताविका पार्क समितीचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी, माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, माजी आमदार प्रा. जोगेंद्र कवाडे, माजी आमदार प्रकाश गजभिये, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, न्यायमूर्ती श्री. किशोर रोही, माजी कुलसचिव डॉ. पूरणचंद्र मेश्राम, नवोपक्रम नवसंशोधन व सहचार्य मंडळ संचालक डॉ. राजेश सिंह, विद्यापीठाचे वित्त व लेखा अधिकारी श्री. हरीश पालीवाल, समितीच्या सदस्य सचिव प्राचार्य डॉ. प्रवीणा बागडे (खोब्रागडे), विद्यापीठ अभियंता पल्लवी गिरी, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंता चहांदे यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते. संविधान प्रास्ताविका पार्कमध्ये अंतर्भूत असलेली भित्ती चित्रे, शिल्पे तसेच संकल्प चित्रा बाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. यानंतर भित्तीचित्रे, शिल्पे तसेच प्रकल्पाचे संकल्पचित्र निश्चित करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या अखत्यारीत येणारे पार्कचे महाद्वार, सुरक्षा भिंत, अंतर्गत रस्ते आधी विविध कामांचा आढावा बैठकीमध्ये घेण्यात आला. पार्कशी संबंधित कामे शासकीय एजन्सी ने लवकरात लवकर पूर्ण करावे याबाबत समितीचे अध्यक्ष गिरीश गांधी आणि विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी सूचना दिल्या. पार्कच्या विकास कामांबाबत विद्यापीठ प्रशासनाकडुन समितीला वेळोवेळी माहिती देण्याच्या सूचना माननीय कुलगुरू डॉ. चौधरी यांनी संबंधितांना दिल्या.

पार्क मधील संबंधित कामे करण्यास सार्वजनिक बांधकाम विभागाने सहमती दर्शविल्याची माहिती विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजू हिवसे व विद्यापीठ अभियंता पल्लवी गिरी यांनी बैठकीत दिली. सार्वजनिक बांधकाम विभागाने पार्कशी संबंधित विकास कामे शक्यतो लवकरात लवकर तातडीने पूर्ण करावे, असे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी सांगितले. सोबतच समितीचे अध्यक्ष गिरीश गांधी, प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्यासह अन्य सदस्यांनी देखील त्यांच्या सूचना बैठकीमध्ये व्यक्त केल्या. बैठकीला विद्यापीठाचे अन्य अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी त्याचप्रमाणे एनएमआरडीएचे अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कर्मचारी क्रिकेट स्पर्धा नागपूरात
## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ भूषविणार यजमानपद



अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कर्मचारी टी- २० क्रिकेट स्पर्धा नागपूर शहरात होणार आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने या क्रिकेट स्पर्धेचे यजमानपद प्राप्त झाले आहे. क्रिकेट स्पर्धा आयोजनाबाबत महत्वपूर्ण बैठक माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभाकक्षात गुरुवार, दिनांक १७ ऑगस्ट २०२३ रोजी पार पडली. यावेळी आयोजनाबाबत चर्चा करण्यात आली.

अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कर्मचाऱ्यांची क्रिकेट स्पर्धा दरवर्षी आयोजित केली जाते. या स्पर्धेला अखिल भारतीय कुलगुरू चषक स्पर्धा देखील म्हटले जाते. राज्यस्तरीय आंतर विद्यापीठ स्पर्धेनंतर अखिल भारतीय स्तरावर या स्पर्धेचे आयोजन केले जाते. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ टी- २० क्रिकेट स्पर्धेमध्ये देशभरातील २८ विद्यापीठांचे संघ सहभागी होणार आहे. सभा कक्षात झालेल्या बैठकीत माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी क्रिकेट स्पर्धेच्या आयोजनाबाबत चर्चा केली. संपूर्ण देशातून साधारणता किती खेळाडू कर्मचारी उपस्थिती लावणार, किती दिवस स्पर्धा चालेल, स्पर्धेत सहभागी होण्याकरिता आलेले क्रिकेटपटू यांच्या निवासाची व्यवस्था आदी विविध विषयावर कुलगुरूंनी माहिती जाणून घेतली. टी-२० लीग क्रिकेट स्पर्धा होणार असल्याने एका संघाकडून अनेक सामने खेळल्या जाणार आहे. त्यामुळे या स्पर्धेत कुलगुरू चषक पटकाविण्यासाठी चांगलीच चुरस पाहायला मिळणार आहे. बैठकीला कुलसचिव डॉ. राजू हिवसे, विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, दिल्ली येथून वजाहत उल्ला खान, आदिल अहमद, हरयाणा (हिसार) येथून दिनेश कुमार, जळगाव येथून सुभाष पवार, डॉ. रामा राव, प्रा. बबलू श्रीगिरीवार, डॉ. आदित्य सोनी, दिनेश दखणे, दर्पण गजभिये, रितेश पूरकाम, सुरज सूर्यवंशी नितीन खरबडे आदी उपस्थित होते.



# प्रवास व पर्यटन विभागात माजी विद्यार्थी सभा
## शैक्षणिक परिसरात केले वृक्षारोपण




राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महात्मा ज्योतीबा फुले शैक्षणिक परिसरात असलेल्या प्रवास व पर्यटन विभागाच्या नविन इमारतीत, शनिवार, दिनांक १९ ऑगष्ट २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता विभागातील माजी विद्यार्थी व नविन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांची सभा पार पडली.

यावेळी प्रास्ताविक करताना विभागाचे मानद संचालक डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे यांनी विभाग व विभागातील वार्षिक कार्याविषयी माहिती दिली. विभागातील विद्यार्थ्याकरीता लघु व दीर्घ शैक्षणिक सहल, हॉटेल व्हीजीट, नेचर ट्रेल, हेरिटेज वॉक आयोजित केली जाते. जागतिक पर्यटन दिवस, राष्ट्रीय पर्यटन दिवस सेलिब्रेशन,




तसेच पर्यटनाच्या विविध विषयावर घेण्यात येणारे अतिथी व्याख्यान आणि पर्यटन विषयावरील विविध कार्यशाळा यांची त्यांनी माहिती दिली. विभागातील शिक्षक डॉ. अरविंद उपासनी, मंजूषा डोंगरे, भाग्यश्री हिरादेवे, नेहा दुबे व शोभणा मेश्राम यांनी स्वतःचा व विभागाचा परिचय देत विभागात वर्षभरात होणाऱ्या कार्याविषयी अवगत केले.

विविध सत्रातील माजी विद्यार्थ्यांनी आपल्या कार्यकाळात असलेल्या अभ्यासक्रमात व आता असलेल्या अभ्यासक्रमात खुप फरक आहे, असे सांगितले. सद्याचा अभ्यासक्रम पर्यटन उद्योगाला पूरक आहे. शिवाय विभागाच्या सह-अभ्यासक्रमातील कार्याविषयी समाधान व्यक्त केले. अभ्यासक्रमातील इंटर्नशिपचा कार्यकाळ वाढविण्याचा सल्ला दिला. त्यांनी त्यांच्या पर्यटन उद्योगामध्ये विद्यार्थ्यांना इंटर्नशिपकरीता स्वागत केले. विभागातील नवीन विद्यार्थ्यांनी विभागात प्रवेश घेतल्यानंतर मागील एक महिण्यात वर्ग शिक्षण घेतलेल्या कार्याचा आढावा विभागाचे माजी विद्यार्थी व विभागात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांसमोर ठेवला. विद्यार्थ्यांचे स्टेज डेअरींग व कम्यूनिकेशन स्किल तसेच प्रेझेंटेशन बघुन पालकांनी विद्यार्थ्यांचे व विभागाचे कौतुक केले. ९ ऑगष्ट पासुन सुरू झालेल्या 'माझी माती, माझा देश' या अभियानाअंतर्गत मातीला नमन, विरांना वंदन या घोषवाक्यांसह देशासाठी प्राणाची आहूती देणाऱ्या विरांना वंदन करण्यात आले. शिवाय या प्रसंगांची आठवण म्हणून विभाग परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. विभागाचे माजी विद्यार्थी, विभागात नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पालक, आजच्या माजी विद्यार्थी व पालक सभेत तसेच वृक्षारोपण कार्यास उपस्थित राहिल्या बद्दल विभागातील शिक्षक परिमल सुरडकर यांनी आभार मानले. सभेला विभागातील शिक्षक व एम.ए.चे विद्यार्थी तसेच माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निरोगी आरोग्यासाठी हवी योग्य जीवनशैली

### प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांचे प्रतिपादन

### विद्यापीठ आरोग्य केंद्रात बोन मिनरल डेन्सिटी तपासणी




निरोगी आरोग्य हवे असेल तर चांगली जीवनशैली आवश्यक असल्याचे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी केले. विद्यापीठ आरोग्य केंद्रात हाडां संबंधित आजारावर सल्ला, प्रतिबंधात्मक उपाययोजना व मोफत तपासणी शिबिराचे आयोजन बुधवार, दिनांक २३ ऑगस्ट २०२३ रोजी करण्यात आले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे शताब्दी महोत्सवी वर्ष तसेच 'माझी माती माझा देश' अंतर्गत आयोजित शिबिराच्या अध्यक्षस्थानावरून डॉ. दुधे मार्गदर्शन करीत होते.

भौतिकतेकडे चाललेल्या जगामध्ये सर्वांची जीवनशैली बदलली आहे. माणूस जणू मशीन झाली आहे. त्यामुळे मानवी शरीर विविध व्याधींनी ग्रस्त आहेत. वाहनाला काही होऊ नये म्हणून आपण त्याचा विमा काढतो. मात्र, त्याप्रमाणे शरीराची काळजी घेत नसल्याची खंत डॉ. दुधे यांनी व्यक्त केली. हाडे ही शरीराची रचना आहे. रचना चांगली असेल तर शरीर पर्यायाने आरोग्य चांगले राहील. आरोग्य चांगले तर आपण सर्व जीवनाचा आनंद घेऊ शकतो. शरीराची हालचाल कमी झाली असून सवयी बिघडल्याने समस्या निर्माण झाली आहे.




योग्य आहार तसेच नियमित तपासणी करून घेण्याचे आवाहन त्यांनी केले. सोबतच शिबिराच्या आयोजनाबाबत आरोग्य केंद्राचे कौतूक केले. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाची अध्यक्षता प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी केली. कार्यक्रमाला अस्थी विकार तज्ञ डॉ. कुलदीप देशपांडे, आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. सरोज शामकुवर उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना अस्थी विकार तज्ञ डॉ. कुलदीप देशपांडे यांनी विकार जडण्यास निष्क्रियता हे महत्त्वपूर्ण कारण असल्याचे सांगितले. उत्तम आरोग्यासाठी संतुलित आहार महत्त्वपूर्ण आहे. असंतुलित आहारातून शरीरातील साखरेचे प्रमाण वाढते. साखरेचे प्रमाण वाढल्यास शरीरातील विविध अवयवांवर त्याचा परिणाम होतो. त्यामुळे योग्य जीवनशैली अवलंबित योग्य आहार आवश्यक असल्याचे डॉ. देशपांडे म्हणाले. शिवाय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने शिबिर आयोजित करून चांगले पाऊल उचलले असून नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

प्रास्ताविकातून महिला वैद्यकीय अधिकारी डॉ. सरोज शामकुवर यांनी विद्यापीठ शताब्दी महोत्सव व 'माझी माती माझा देश' या अंतर्गत बोन मिनरल डेन्सिटी तपासणी शिबिराचे आयोजन केल्याचे सांगितले. यापूर्वी आयोजित केलेल्या हृदयरोग निदान तपासणी शिबिराला चांगला प्रतिसाद मिळाल्याचे त्या म्हणाल्या. शिवाय या शिबिराच्या आयोजनामागील भूमिका त्यांनी विशद केली. कार्यक्रमाचे संचालन ललित कला विभागाच्या प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात यांनी केले तर आभार डॉ. सरोज शामकुमार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आरोग्य केंद्रातील मनीष ठाकरे, प्रकाश वानखडे, प्रकाश घोषीकर, निलेश कनेर, शैलेश इरपाची यांनी प्रयत्न केले.




## तुलसी लोक कवी - प्रो. गीता सिंह

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात तुलसी जयंती समारोह

तुलसी यांच्या कविता लोक कविता आहेत. त्यांच्या कवितांमधून लोक जीवनातील उच्च आदर्श दिसून येतात. त्यांच्या साहित्यात लोक जीवनाच्या विविध बाबी दिसून येत असल्याचे प्रतिपादन साहित्यिक प्रो. गीता सिंह यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या हिंदी विभागात तुलसी जयंती समारोह पार पडला. यावेळी साहित्यिक प्रो. गीता सिंह मार्गदर्शन करीत होत्या.

तुलसी यांचे विचार भारतीयांच्या जीवनाचा आरसा असून त्यामध्ये भारतीय जीवनमूल्य अंकित असल्याचे प्रोफेसर गीता सिंह यांनी पुढे बोलताना सांगितले. तुलसी यांच्या कविता आपणास सामाजिक जीवनामध्ये उच्च मानवीय मूल्यांची शिकवण देत असल्याचे प्रोफेसर सिंह म्हणाल्या. विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनात हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे यांनी कार्यक्रमाची अध्यक्षता केली. तुलसी भारतीय समाजाचे एक असे नायक आहेत की त्यांनी जीवनातील उदात्त बाबींसह अनेक सामाजिक

विसंगतींचे चित्रण केले आहे. त्यांच्या काव्यातून लोक जीवनातील विविध छटा दिसून येतात. आपणास तुलसी यांचे साहित्य वाचन त्यातील कवी मर्म लक्षात घेत करणे गरजेचे असल्याचे डॉ. पांडे म्हणाले. आभार व्यक्त करताना विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. संतोष गिऱ्हे यांनी तुलसी एक लोकशाहीवादी कवी असल्याचे सांगितले. त्यांच्या साहित्यातून जनजीवनातील यथार्थ चित्रीत झाला आहे. कार्यक्रमाचे संचालन डॉ. लखेश्वर चंद्रवंशी यांनी केले. कार्यक्रमाला आयकर विभागाचे सहाय्यक निदेशक (राजभाषा) अनिल त्रिपाठी, विभागातील प्राध्यापकगण डॉ. सुमित सिंह, डॉ. गुंजनलाल लिल्हारे, डॉ. जागृती सिंह, प्रा. दामोदर द्विवेदी, प्रा. दिशांत पाटील, प्रा. रूपाली हिवसे यांच्यासह विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

## आत्मनिर्भरता राष्ट्रीय प्रगतीचा मार्ग प्रशस्त करेल

### आत्मनिर्भर भारत संयोजक ओमप्रकाश शर्मा यांचे प्रतिपादन




भारतीय शिक्षण प्रणालीमध्ये आत्मनिर्भरतेवर भर देण्यात आला आहे. मात्र, पश्चिमात्य पद्धतीचा अवलंब केल्याने आपल्या आधुनिक शिक्षण व्यवस्थेत यावर पुरेपूर विचार केला गेला नाही. परिणामी, आपल्या देशात शिक्षित बेरोजगारांची मोठी फौज तयार झाली. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण या समस्येचे समाधान शोधत कौशल्यपूरक शिक्षणाला प्रोत्साहित करीत असल्याचे प्रतिपादन आत्मनिर्भर भारत अभियानाचे मध्य प्रांत संयोजक तथा शिक्षण तज्ञ ओमप्रकाश शर्मा यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या हिंदी विभागात आयोजित आत्मनिर्भर भारताची संकल्पना या विषयावर ते मार्गदर्शन करीत होते.

देशाला विकसित राष्ट्र बनविण्याकरिता युवकांना आत्मनिर्भर होण्याचे शिक्षण देणे गरजेचे आहे. स्वयंरोजगाराकडे वळविणारे शिक्षण युवकांना मिळणे गरजेचे आहे. कारण, आत्मनिर्भरता हीच देशाच्या प्रगतीचा मार्ग प्रशस्त करेल असे शर्मा पुढे बोलताना म्हणाले. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे यांनी कार्यक्रमाची अध्यक्षता केली. आत्मनिर्भरता व्यक्तिमत्व विकासाची प्रथम पायरी असल्याचे डॉ. पांडे म्हणाले. आत्मनिर्भर व्यक्ती हा समाज आणि देशाच्या विकासामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका निभावू शकतो. तो व्यक्ती देशातील युवकांना स्वावलंबी बनविण्यात मदत देखील करू शकतो. युवक स्वतःच्या पायावर उभे झाले तरच देशाची विकासाकडे वाटचाल होऊ शकते. देशातील युवक कौशल्य आधारित ज्ञानाने समृद्ध झाला तरच समाजाचा विकास होतो असे डॉ. पांडे म्हणाले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. सुमित सिंह यांनी केले तर आभार सहयोगी प्राध्यापक डॉ. संतोष गिरहे यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ. लखेश्वर चंद्रवंशी, डॉ. कुंजन लाल लिल्हारे, प्रा. जागृती सिंह, प्रा. दिशांत पाटिल, प्रा. रूपाली हिवसे यांच्यासह विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

## हत्तीरोग संक्रमण निर्मूलन शिबिराला उस्फूर्त प्रतिसाद

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे आयोजन



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरातील ग्रामगीता भवन येथे शुक्रवार, दिनांक २५ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता आयोजित हत्तीरोग विषाणू प्रतिबंधात्मक उपायासाठी औषधी वितरण शिबिराला उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. विद्यापीठाचे माननीय प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांच्या हस्ते शिबिराचे उद्‌घाटन करण्यात आले.

हत्तीरोग विषाणूंचे संक्रमण होऊ नये म्हणून नागपूर महापालिका प्रशासनाच्या वतीने अभियान राबविले जात आहे.



सोबतच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी महोत्सवी वर्ष आणि 'माझी माती माझा देश' अभियान अंतर्गत या औषध वितरण शिबिराचे आयोजन माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, फुटाळा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. रेणुका यावलकर, विद्यापीठ आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. सरोज शामकुवर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे यांची उपस्थिती होती. उद्घाटनानंतर या शिबिरात विद्यापीठातील विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी व शिक्षकेतर कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांकरिता हत्तीरोग संक्रमण रोखण्याकरिता औषधी वितरण करण्यात आले. शिबिराच्या यशस्वीतेकरिता आरोग्य केंद्रातील मनीष ठाकरे, प्रकाश वानखडे, प्रकाश घोषीकर, निलेश कनेर, शैलेश इरपाची, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन केंद्रातील छाया खोब्रागडे, कल्याणी मेश्राम, अमित शेंडे, मनपा फुटाळा पीएचसी मधील प्रणाली भैसारे, दिपाली पवार, सुषमा राठोड, मीनाक्षी कुबडे, कविता चव्हाण, राजश्री दातरकर यांनी सहकार्य केले.

## प्रेमचंद भारतीय समाज के प्रहरी थे



**भास्कर प्रतिनिधि| नागपुर.** प्रेमचंद अपने समय के सर्वाधिक साहसी और संवेदनशील रचनाकार थे। उन्होंने समाज की ऐसी विसंगतियों को उजागर किया जिनसे न सिर्फ समाज त्रस्त था, बल्कि उन्हें बचाए -बनाए रखने के लिए संकल्पित भी था। प्रेमचंद स्त्री से जुड़ी समस्या को देखने की एक नई दृष्टि देते हैं। वे वास्तव में समाज के प्रहरी थे। यह विचार कोलकाता स्थित डॉ. बाबासाहब आंबेडकर शिक्षा विश्वविद्यालय की कुलपति प्रो. सोमा बंदोपाध्याय ने सोमवार को राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय के स्नातकोत्तर हिंदी विभाग द्वारा आयोजित प्रसिद्ध रचनाकार मंशी ...

मुख्य अतिथि व्यक्त किए। वे वीडियो कांफ्रेंसिंग के जरिए इस कार्यक्रम का हिस्सा बनी। 'प्रेमचंद : आज के संदर्भ में' विषय पर अपने विचार रखते हुए प्रो. सोमा ने प्रेमचंद के साहित्य में चित्रित स्त्री के विविध संदर्भों पर प्रकाश डाला। कार्यक्रम की अध्यक्षता करते हुए हिंदी विभागाध्यक्ष डॉ. मनोज पाण्डेय ने कहा कि प्रेमचंद भारतीय साहित्य के एक ऐसे हस्ताक्षर थे, जिनके लिए लिखना शगल नहीं, बल्कि जिम्मेदारी का एहसास था। उन्होंने भारतीय समाज की समस्याओं को सिर्फ अनावृत्त नहीं किया, बल्कि उनके सार्थक समाधान की भूमि भी तैयार करने की पहल की। संचालन डॉ. सुमित सिंह ने किया। आभार सहयोगी प्राध्यापक डॉ. संतोष गिरहे ने माना। इस अवसर पर डॉ. कुंजनलाल लिल्हारे, डॉ. एकादशी जैतवार, प्रा. जागृति सिंह, आयकर विभाग नागपुर के सहायक निदेशक अनिल त्रिपाठी, डॉ. ...

## वैश्विक मूल्यों पर आधारित है नई शिक्षा नीतिः डॉ.दुधे

**भास्कर प्रतिनिधि| नागपुर.** देश में लागू की जा रही नई राष्ट्रीय शिक्षा नीति वैश्विक मूल्यों पर आधारित है। इसमें संस्कृतिक, सामाजिक और अध्यात्मिक मूल्यों को शामिल करके संपूर्ण बनाया गया है। राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय के प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे ने रामटेक स्थित कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय में आयोजित राष्ट्रीय शिक्षा नीति सप्ताह के समापन सत्र में बतौर मुख्य अतिथि अपने विचार रखे। उन्होंने कहा कि, संस्कृत विश्वविद्यालय ने जिस



तीव्रगति से नई शिक्षा नीति को लागू किया, उसके लिए कुलगुरु समेत सभी सहयोगी अभिनंदन के पात्र हैं। वैश्विकल मूल्यों से परिपूर्ण इस शिक्षा नीति से विद्यार्थियों का सर्वांगिण विकास होगा। उन्हें अपने पसंद के विषय चुनने का पूरी आजादी होगी, यहीं इस नीति की खूबी है।

**सर्वांगीण विकास में सहायक : प्रो. त्रिपाठी :** कार्यक्रम की अध्यक्षता कर रहे संस्कृत विवि कुलगुरु प्रो. हरेराम त्रिपाठी ने अपने संबोधन में कहा कि, राष्ट्रीय शिक्षा नीति में मातृभाषा, क्षेत्रीय भाषा से लेकर तो भारतीय ज्ञान परंपरा को महत्त्व दिया गया है, जिससे विद्यार्थियों के व्यक्तित्त्व निर्माण को नई दिशा मिलेगी। महाराष्ट्र शासन ने विश्वविद्यालय को भारतीय ज्ञान परंपरा पर आधारित विविध पाठ्यक्रम शुरु करने का आदेश दिया था, विवि ने इस पर अमल करते हुए अनेक नए पाठ्यक्रम शुरु किए हैं। गौरतलब है कि, प्रदेश सरकार के आदेशानुसार संस्कृत विवि में 24 से 29 जुलाई के बीच राष्ट्रीय शिक्षा नीति सप्ताह का आयोजन किया गया था। समापन सत्र के दौरान मंच पर कुलसचिव डॉ. रामचंद्र जोशी, सभी अधिष्ठाता, प्रो. मधुसूदन पेन्ना, प्रो. कविता होले, प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, प्रो. ललिता चंद्रात्रे, प्रो. हरेकृष्ण अगस्ती और राष्ट्रीय शिक्षा नीति समन्वयक व उप-कुलसचिव डॉ. स्मिता फडणवीस उपस्थित थे। इस पूरे आयोजन में कॉलेजों के लिए वेबिनार, एकेडमिक बैंक ऑफ क्रेडिट पर कार्यशाला, नई शिक्षा नीति पर विशेषज्ञों के विचार, लेख व संबोधन कार्यक्रमों का आयोजन किया गया।

**देशोन्नती**

## पाली ही जगातील समृद्ध भाषांपैकी एक

डॉ. निशांत लोहागुण यांचे प्रतिपादन

देशोन्नती वृत्तसंकलन...



नागपूर समृद्ध भूमी

विभाग प्रमुख डॉ. निरज बोधी यांनी आपले अध्यक्षीय संबोधन करताना म्हटले की, पाली भाषेकरिता नागपूर ही समृद्धभूमी आहे. पाली भाषेला समाजातील प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचविणे हे आपले कर्तव्य आहे.

संबंध अन्य भारतीय भाषेशी अधिक जवळचा आहे. पाली ही भाषा जगातील सर्वात समृद्ध भाषेपैकी एक भाषा आहे. बुद्धत्वाचा अनुभव धारण करण्याची व त्याचे पालन व रक्षण करण्याची क्षमताही पाली भाषेमध्ये दिसून येते.'

केंद्र व राज्य सरकारच्या जनगणना विभागातील डॉ. लोहागुन आणि रुचिता तेलंग हे पाली ही मातृभाषा आहे? याबद्दलचा शासकीय सर्वे करण्यासाठी नागपूरला आले होते. या प्रसंगी त्यांनी पाली भाषेच्या अभ्यासकापुढे आपले विचार व्यक्त केले. प्रसिद्ध कायदेतज्ञ डॉ. शैलेश नारनवरे यांनी पाली भाषेसाठी चाललेल्या न्यायिक संघर्षाबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी म्हटले की पाली भाषेचा समृद्ध वारसा असून सुद्धा पाली भाषेशी सावत्र वागणूक हेतुपुरस्सर केली जात आहे. पाली भाषेला आठव्या परिशिष्टामध्ये स्थान मिळाले पाहिजे व पाली विद्यापीठ झाले पाहिजे यासाठी आपण कशाप्रकारे कायदेशीर संघर्ष केला पाहिजे, याची तपशीलवार माहिती ॲड. शैलेश नारनवरे यांनी याप्रसंगी दिली.

परिसंवादात डॉ. रेखा बडोले, डॉ. सुजित वनकर आणि प्रा. सरोज वाणी यांनी पालीभाषेतून आपले विचार मांडले. डॉ. रेखा बडोले यांनी पाली भाषेची महती प्रकट केली. प्रा. सरोज वाणी यांनी पाली भाषा एक समृद्ध भाषा आहे, असे मत मांडले तर डॉ. सुजित वनकर यांनी 'पाली भाषेचा इतिहास आणि उपयोगिता' या विषयावर संवाद साधला.

